# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४३

## सभावृत्तांत

दिनांक :- १५.०२.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०१० ची मासीक मा.महापालिका सभा सोमवार दिनांक १५.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर

२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर

३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा

४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ

५. मा.जाधव विजया अशोक (मामी)

६. मा.थोरात एकनाथ दादा

७. मा.दत्तात्रय बाबुराव साने

८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव

९. मा.लोखंडे सुजाता सुनिल

१०. मा.बो-हाडे शरद परशुराम

११. मा.आल्हाट शांता महेंद्र

१२. मा.डॉ. सौ. मीना पाटील

१३. मा.खेडकर घनशाम रामचंद्र

१४. मा.कुंभार रामदास तानाजी

१५. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१६. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१७. मा.गवळी विजया पंडित

१८. मा.अजित दामोदर गव्हाणे

१९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

२०. मा.महेश किसन लांडगे

२१. मा.आशा अंकुश लांडगे

२२. मा.मोहिनी विलास लांडे

२३. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२४. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.काळूराम मारुती पवार

३३. मा.आझम फकीरभाई पानसरे

३४. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३५. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३६. मा.भापकर मारुती साहेबराव

३७. मा.शेट्टी जगदिश

३८. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३९. मा.बोबडे भिमा सखाराम

४०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४१. मा.गवळी शशीकिरण

४२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४३. मा.उबाळे वैशाली संजय

४४. मा.सुमनताई मधुकर पवळे

४५. मा.कुमार आर. एस.

४६. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४७. मा.उल्हास शेट्टी

४८. मा.जावेद शेख

४९. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५०. मा.कुटे गोपाळ नाना

५१. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५२. मा.भोंडवे तुकाराम महादू

५३. मा.खानोलकर मनोज विक्रम

५४. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५६. मा.वाघ रघुनाथ दलपत

५७. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५८. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५९. मा.आण्णा दादू बनसोडे

६०. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६१. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६२. मा.अपर्णा निलेश डोके

६३. मा.गावडे जयश्री वसंत

६४. मा.साबळे जगन्नाथ दगडू

६५. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६६. मा.रामआधार धारिया

६७. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७०. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

७२. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७३. मा.भारती ज्योती सुखलाल

७४. मा.कोकणे संतोष अंकुश

७५. मा.सुतार विजया विजय

७६. मा.दरेकर सतीश दगडू

७७. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७८. मा.बारणे संतोष नागु

७९. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

८०. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

८१. मा.कलाटे कमल तानाजी

८२. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

८३. मा.खोमणे लता हनुमंत

८४. मा.प्रशांत शितोळे

८५. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८६. मा.अशोकभाई सोनवणे

८७. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८८. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८९. मा.जगताप शंकर पांडुरंग

९०. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

९१. मा.एकनाथ मोटे

९२. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९३. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९५. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९७. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

९८. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९९. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

१००. मा. विनायक सुरेश रणसुभे

१०१. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

१०२. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख मा.पवार, मा.कारचे, मा.फडणीस,मा.गावडे, मा.गायकवाड, मा.भोसेकर-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.पाटिल-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.लोंढे-मुख्य लेखापाल मा.जाधव, मा.चव्हाण-कार्य.अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.फुगे-मुख्य आयातकर अधिक्षक, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १२ अन्वये प्रश्न न्यायाधिशांकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, पुणे येथील बॉम्बस्फोटाचा निषेध करुन त्यात मृत झालेल्या व्यक्तींना तसेच जुन्या पिढीतील ज्येष्ठ पत्रकार व रोहिणी शुभमंगलचे उद्‌गाते-वसंतराव काणे, पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस व नगरसदस्य संतोष कोकणे यांचे चुलते-पै.किसन लक्ष्मण कोकणे, महापौर कार्यालयातील कर्मचारी-ज्ञानेश्वर उर्फ माऊली लांडगे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयातील अतिक्रमण विभागामधील प्रशासन अधिकारी-मुरलीधर वेदपाठक, पुणे महापालिकेतील नगर उपअभियंता-अरुण शिर्के, दळवीनगर झोपडपट्टी-राहीबाई लक्ष्मण जोगड,गिरीजाबाई श्रीधर जाधव, कलावती काशिनाथ वरपे, शंकर नातू पानसरे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली लांडगे यांच्या कार्यकाळामध्ये १९ महापौर झाले आहेत त्यांनी त्यांच्या कालावधीमध्ये त्यांचे कामकाज चोख केलेले आहे. तसेच पुणे शहरात मोठा बॉम्बस्फोट झालेला आहे त्याठिकाणी ९ जण मरण पावलेले आहेत व ६० जण जखमी झालेले आहेत. तरी

ज्ञानेश्वर लांडगे आणि बॉम्बस्फोटामध्ये मरण पावलेल्या लोकांना श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकूब करणेत यावी.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, केंद्रिय गुप्तचर विभागाकडून माहिती मिळालेली असताना पुणे येथे बॉम्बस्फोट होऊ शकतो, असे असताना सुरक्षा यंत्रणा चोख नव्हती. मा.मुख्यमंत्री यांच्याकडून अशी माहिती मिळाली नसल्याचे बोलण्यात आले व मा.गृहमंत्री यांनी गुप्तचर यंत्रणेनी अशी माहिती दिलेली होती असे सांगीतलेले आहे तरी सुध्दा मा.मुख्यमंत्री यांनी असे वक्तव्य केलेले आहे, याचा निषेध करुन मृत व्यक्तिस श्रध्दांजली अर्पण करते.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, संपुर्ण जगामध्ये पुणे शहराची ओळख विद्येचे माहेरघर आणि महाराष्ट्राची सांस्कृतीक राजधानी म्हणून नावलौकीक आहे. याठिकाणी माणूस अतीशय शांतपणे राहू शकतो परंतू अलीकडच्या काळात झालेली पुणे शहराची प्रगती व ही प्रगती निश्चितच अतिरेक्याच्या हिटलिस्टवर आहे. कारगीलचे युध्द असू द्या किंवा संसदेवरचा हल्ला असू द्या कोणताही अतिरेकी हा अतिरेकीच असतो, अतिरेक्याला जात,प्रांत नसतो त्यापलीकडे गेलेली त्याची प्रवृत्ती असते. नागरीकांनी कशाप्रकारे याला तोंड द्यावे याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडलेली आहे. अशा वातावरणामध्ये आपल्या आजुबाजूला असलेल्या व्यक्ति त्यांच्या हालचाली याच्याकडे सुध्दा कार्यकर्त्यानी व आपण सर्वानी लक्ष ठेवणे आवश्यक आहे. आपल्या महापालिकेमध्ये सुध्दा प्रायव्हेट सुरक्षा यंत्रणा ठेवता आलीतरी ती ठेवावी. भौतीक प्रगती ही डोळयामध्ये खुपत असते यासाठी आपण कोणतेही सामाजीक,राजकीय भांडवल न करता सर्वानी भारताचा नागरीक या नात्याने याला तोंड देणे आवश्यक आहे. यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या कुटूंबीयाना दुःख झालेले आहे ते दुःख सहन करण्याची त्यांना ताकद मिळो अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो व श्रध्दांजली वाहतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, १३ तारखेला संध्याकाळी ७.४५ वा.पुणे येथे जर्मन बेकरी याठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये ९ जण मृत्युमुखी पडलेले आहेत व अनेकजण जखमी झालेले आहेत. केंद्रीय गृहमंत्री मा.पी.चिदंबरम, मा.आर.आर.पाटिल, मा.अजीतदादा पवार यांनी त्याठिकाणी भेट दिली आहे त्यांनी वेगवेगळया प्रकारे सहाय्य करण्याचे आदेश दिले आहेत. त्याठिकाणी शंकर नातू पानसरे हा रिक्षा ड्रायव्हर मृत्यूमुखी पडलेला आहे त्यांच्या कुटूंबावर मोठा आघात झालेला आहे. त्यांच्या कुटूंबामध्ये वडील,आई,मिसेस व दोन मुले आहेत. त्यांचे वडील पॅरेलेसेसने आजारी आहेत. त्यांना आपल्या महापालिकेतर्फे एक

लाख रुपये द्यावेत अशी सूचना करतो व यामध्ये मरण पावलेल्याना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब,पुणे येथे झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करते. खरेतर माणूसकीला काळींबा फासणारी ही घटना आहे. या घटनेचा जेवढया तीव्र शब्दात निषेध करावा तेवढा कमी आहे. पुणे शहर सुध्दा असुरक्षीत आहे अशा शब्दात बोलावे लागेल. यामागे अनेक कारणे असू शकतात. आतंकवादी आपल्याकडे येतात त्यांना रस्ता मिळतो याचे कारण असे की आपण सगळेजण पोलीस यंत्रणेवर अवलंबून असतो हे विचार करण्यासारखे आहे. आपल्या राज्याअंतर्गत, देशाअंतर्गत कुठल्या कुठल्या कारणाने कायदा व सुव्यवस्था विस्कळीत करण्याचे प्रयत्न करण्यात येतात त्याचा फटका लोकांना बसतो तरी या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. काल मी स्वत: व मा.रामदास आठवले जर्मन बेकरी याठिकाणी जाऊन आलो. ज्या लोकांचा काहीही संबंध नाही अशा लोकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे ही निंदनीय गोष्ट आहे. पोलीस यंत्रणेला,राज्यकर्त्यांना दोष देण्यापेक्षा आपण आणखी काय चांगले करु शकू याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जे सुशिक्षीत बेरोजगार तरुण आहेत यांना पोलीसमध्ये भरती करुन अशा सुरक्षा व्यवस्थेसाठी ठेवलेतर बरे होईल. पोलीस यंत्रणा मजबूत करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगारांची भरती करावी अशी सूचना करते आणि मृत्यूमुखी पडलेल्या नागरीकांना आरपीआयच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, परवा झालेली घटना अतीशय दु:खद घटना आहे. आपल्या महापालिकेच्या वतीने अशा घटना घडतात त्याच्यावर काय उपाययोजना करता येऊ शकतात हे पाहणे आवश्यक आहे. आपल्या शेजारच्या महापालिका परिसरामध्ये ही घटना घडलेली आहे. ही घटना भविष्यामध्ये कुठल्याही ठिकाणी घडू शकते. ती घडू नये यादृष्टिने महापालिकेकडून ज्या उपाययोजना करता येऊ शकतात त्या करणे गरजेचे आहे. महापालिका ऐरियातील प्रॉपर्टिमध्ये कोणकोणत्या व्यक्ति राहतात याची नोंद आपल्याकडे आणि पोलीस स्टेशनकडे असणे आवश्यक आहे. नवीन भागामध्ये चाळी आहेत, फ्लॅट तयार होतात,हॉटेल आहेत त्याठिकाणी लोक वास्तव्य करतात. फ्लॅटधारांनी, चाळमालकांनी त्या प्रॉपर्टिमध्ये नेमके कोण राहतात याची नोंद केली पाहिजे. प्रगत राष्ट्रामध्ये अशा नोंदी असतात. त्याने ती प्रॉपर्टि सोडलीतर तसे त्याठिकाणच्या महापालिकेला किंवा पोलीस स्टेशनला कळवावे लागते अन्यथा गुन्हा दाखल होतो. याप्रकारच्या आपल्याकडे नोंदी पाहिजेत.

मा.उषा ढोरे :- मा.महापौर साहेब, पुण्यासारख्या शहरामध्ये अतीशय धक्कादायक असा बॉम्बस्फोट झालेला आहे. अशा गोष्टी घडत असताना आपली सुरक्षा त्यांच्या परीने काम करत असते पण काही गोष्टी ज्या असतात त्या निदर्शनास येत नाहीत आपल्या भागामध्ये अशी यंत्रणा असावी की या गोष्टी पटकन लक्षात आल्या पाहिजेत अशा यंत्रणेचा शोध लागलातर बरे होईल. ज्या जर्मन बेकरीमध्ये स्फोट झाला त्या भागामध्ये जास्तीत जास्त बाहेरच्या देशाचे लोक राहत आहेत. त्याठिकाणी ओशो आश्रम आहे. त्याठिकाणी हेडली सारखा माणूस येऊन राहतो त्याची वाच्यता होत नाही. जे कोणी आपल्या आसपास राहतात त्याची पुर्णपणे माहिती देणे आवश्यक आहे. बॉम्बस्फोट झाल्यानंतर चर्चा होते पण कृतीमध्ये येत नाही. त्याठिकाणी ९ जण मृत्यूमुखी पडलेले आहेत व ६४ जण जखमी झालेले आहेत. त्याठिकाणी दोषी नसलेल्या महिलाचे निधन झालेले आहे. शहरामध्ये जे लोक भाडयाने घरे घेवून राहतात त्यांच्यासाठी वेगळा नियम लाऊन त्याचा सर्व्हे करणे आवश्यक आहे. आश्रमामध्ये, हॉटेलमध्ये नागरीक राहतात ते बिनधास्त फिरत असतात, त्याना कोठेही ओळखले जात नाही. असे परदेशी लोक राहतात ते काय कारणाने राहतात त्यांच्यापासून धोका आहे का याची माहिती घेणे आवश्यक आहे. जखमी झालेले आहेत त्यांना लवकरात लवकर हॉस्पिटलची ट्रिटमेंट मिळो मृत्युमूखी पडलेल्या लोकांच्या कुटूंबा बरोबर आपण आहोत. मृत्यूमुखी पडलेल्या सर्वाना श्रध्दांजली वाहते.

मा.अलकाताई यादव :- मा.महापौर साहेब, ज्या खोल्या भाडयाने असतात त्या प्रत्येक भाडेकरुचे एका फॅार्ममध्ये पुर्ण माहिती व फोटो पोलीस स्टेशनला द्यायला पाहिजे व त्याठिकाणी तशी नोंद केली पाहिजे. पुर्वी असा नियम निघालेला होता पण भाडेकरुनी कुठेही नोंद केलेली नाही. तरी महापौरांनी अशा नोंदी करण्याबाबत पुढाकार घ्यावा. माझ्या सुध्दा पन्नास खोल्या भाडयाने आहेत. मी मृत्यूमूखी पडलेल्या सर्वांना श्रध्दांजली वाहते.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,पुण्यामध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमूखी पडलेल्या व्यक्तिना श्रध्दांजली अर्पण करतो. करसंकलन विभागा मार्फत एखादया मालकाने भाडयाने रुम दिलीतर त्या रुमचा कमर्शिअल टॅक्स लागतो व तो सोडून गेलातर तसे लेखी पत्राने कळविलेतर त्याचा कमर्शिअल टॅक्स कमी सुध्दा होतो. जर आपल्याला असे काही करता आलेतर याठिकाणी नवीन माणुस आला की त्याचा पुर्ण पत्ता दिलातर बरे होईल. नवीन आलेल्या माणसाला ओळखपत्र,व्हीसा देणे कम्पलसरी असते तसे असलेल्या भाडेकरुंची संपुर्ण माहिती पोलीसस्टेशनला जात नाही. पोलीस खात्यानी आणि महापालिकेनी समन्वय साधुन त्यावर काही उपाययोजना केलीतर या गोष्टीचा छडा लागल्याशिवाय राहणार नाही. पुण्यामध्ये गजबजेलेल्याठिकाणी हा बॉम्बस्फोट झालेला आहे. पोलीस खात्याची आणि आपल्या प्रशासनाची एकत्रित मिटिंग घेवून आपल्या शहरातील गजबजलेल्या ठिकाणच्या सुरक्षेच्या दृष्टिने त्याठिकाणी काय

करु शकतो हे बघावे. गर्दीच्याठिकाणी अशाप्रकारच्या घटना घडविल्या जातात. पुण्यामध्ये बॉम्बस्फोट झालेला आहे, अपघात होण्यापुर्वी काहीतरी काळजी घेतली पाहिजे. या शहराच्या जास्तीत जास्त सुरक्षेच्या दृष्टिने आपण काही उपाययोजना करु शकतो का हे बघावे. आपण स्मार्टकार्डची योजना या शहरातील लोकांसाठी राबविणार होतो परंतु त्याचे पुढे काय झाले हे समजले नाही. यामध्ये जे जखमी झालेले आहेत ते लवकरात लवकर बरे होओत हल्लेखोराचा निषेध करुन मृत्युमूखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहतो.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब,सर्वात प्रथम जर्मन बेकरी याठिकाणी झालेल्या भ्याड बॉम्ब हल्ल्याचा निषेध करुन जे निष्पाप त्यामध्ये मृत झालेले आहेत त्यांच्या आत्म्यास शांती लाभो म्हणून श्रध्दांजली अर्पण करतो. मुंबईमध्ये हल्ला झाला संसदेवर हल्ला झाला, काश्मिरमध्येतर सतत अतिरेक्यांचे हल्ले चालू आहेत, काल पुण्यामध्ये झाला. अतिरेक्याला कोणत्याही जातीचा चेहरा नाही. अतिरेकी पाकिस्तानमध्ये आहेत, इंग्लंडमध्ये आहेत,अमेरिकेमध्ये आहेत अतिरेकी ही प्रवृत्ती आहे. अमेरीकेसारख्या देशामध्ये हल्ला झाला परंतू त्यानंतर परत हल्ला झालेला नाही याचा बोध आपण घेतला पाहिजे. पुन्हा हल्ले होऊ नयेत यासाठी शासन प्रयत्न करते असे दिसत नाही. तेवढया पुरते वातावरण निर्माण झाले की लगेच सगळीकडचे रस्ते बंद ठेवतो परंतु २४ तास जनतेचे संरक्षण व्हावे यासाठी प्रयत्न होणार का नाही. किती अतिरेक्याना पकडले, किती अतिरेकी पळून गेले. आपल्या देशातील प्रशासन कमकुवत आहे असे दिसून येते. माझ्या सारखा कार्यकर्ता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नगरसेवकाच्या माध्यमातून शासनाला विचारणा करतो की किती काळ हे आघात आपण सहन करणार आहोत. कुठेतरी एखादया चित्रपटाचे किंवा नाटकाचे राजकीय भांडवल करुन त्यांना पंधरा-पंधरा दिवस संरक्षण देतो. माय नेम ईज खान, झेंडा या चित्रपटाला संरक्षण देतो चाळीस हजार पोलीस नको तेथे संरक्षणाला देतो, हे प्रश्न चर्चेनी सुटले पाहिजेत. या देशामध्ये कोणीही यावे आणि स्फोट करुन जावे हे कायमस्वरुपी चाललेले आहे या घटनेचा निषेध करतो. यापुढे अशा पध्दतीचा भ्याड हल्ला होत असेलतर जे शासन सत्तेवर असेल तेच जबाबदार असेल. तरी याचा निषेध करतो.

मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब, पुण्यामध्ये बॉम्बस्फोट झाला त्याचा तीव्र निषेध करतो. या बॉम्बस्फोटामध्ये जे नागरीक शहीद झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो हा बॉम्बस्फोट होण्या मागे अनेक कारणे आहेत, शासनाचे अपयश आहे,लोकांचे दुर्लक्ष आहे. वास्तविक पाहता पोलीस खात्याकडून अनेकवेळा सुचना केल्या जातात की कोणतीही अनोळखी बॅग दिसलीतर तीला स्पर्श न करता पोलीसाना माहिती दया. परंतु बॅग दिसली की ती उघडण्याची घाई होते जे अतिरेकी फोफावले आहेत त्यास आपली न्यायव्यवस्था सुध्दा जबाबदार आहे. संसदेवर हल्ला झालेला आहे त्यास फाशी देणे हे सुध्दा आणखीन वेटिंगलिस्टवर आहे त्यामुळे त्यांना वाटते दहा-पंधरा वर्षेतरी आपण जीवंत राहू शकू. याकरिता

शासनाने सुध्दा कायदयामध्ये बदल करुन अतिरेक्यांना लवकरात लवकर फासावर कसे लटकवता येईल हे पाहिले पाहिजे. महापालिकेनी सुध्दा लोकांमध्ये जागरुकता निर्माण होईल असे करावे. बॉम्बस्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पुण्यामध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या सर्व निष्पाप नागरीकांना श्रध्दांजली वाहतो व झालेल्या घटनेचा निषेध करतो. २६/११ ची मुंबईची घटना असेल किंवा कालची १३/२ ची पुण्याची घटना असेल या घटनेमध्ये बाहेरच्या शक्तिपेक्षा अंतर्गत जी शक्ति आहे त्याचा सुध्दा मोठा सहभाग आहे. देशाच्या सुरक्षेला धोका पोहचविल्याबद्यल काही देशविरोधी शक्ति त्यामध्ये जबाबदार आहेत. यामध्ये शासनाला सुध्दा दोष देतो कारण शासन सुध्दा दुबळे झालेले आहे आणि दुबळया शासना काडून सर्वसामान्य नागरीकांनी काय अपेक्षा करायची. म्हणून पुढील कालावधीमध्ये या सुरक्षिततेसाठी, आपल्या परिसरातील सुरक्षिततेसाठी आपण सर्वानी सज्ज राहिले पाहिजे. असे प्रकार टाळण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे आणि दुर्लक्ष केलेतर केवळ श्रध्दांजली वाहून अशा घटना थांबणार नाहीत तुम्ही-आम्ही सक्षमतेने राहून या गोष्टीचा निषेध करुन प्रतिकार करायचा आहे. पुन्हा एकदा मृत्युमूखी पडलेल्याना श्रध्दांजली वाहतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, पुण्यामध्ये अतिरेक्यांनी भ्याड हल्ला निष्पाप नागरीकांवर केला त्याबद्यल निषेध करतो आणि श्रध्दांजली अर्पण करतो. आपल्या शहरात मिळकती, फ्लॅट,चाळी आहेत हे फ्लॅटमालक,चाळीमालक रुम भाडयाने देतात. यासंदर्भात आपल्याकडे मिळकतीची नोंद असते तशी नोंद पोलीसखात्यामध्ये घ्यावी या सूचनेचा निश्चितच फायदा होणार आहे. शासनाचा हलगर्जीपणा, शासनाचा दोष अनेक व्यक्तिनी मांडला आहे. केंद्रीय गुप्तचर विभागाने शहरामध्ये अशाप्रकारचे हल्ले होतील अशा सुचना केलेल्या असताना सुध्दा महाराष्ट्र शासनाने पुणे शहरामध्ये जो बॉम्बस्फोट झाला त्याची काळजी घेतली नाही. ती काळजी घेतली नाही म्हणून बॉम्बस्फोट झाला आहे. याठिकाणी झेंडा,माय नेम ईज खान,शिक्षणाच्या आयचा घो या चित्रपटाचा उल्लेख झाला. चित्रपटाला मोठया प्रमाणात संरक्षण दिले आणि अतिरेक्यानी ते शोधून निरपराध लोकांवर हल्ले केले. यामध्ये शासन अपयशी ठरलेले आहे,इतर संघटना सुध्दा अपयशी राहिलेल्या आहेत.आंदोलन,संघर्ष होत असतात. परंतु हा लोकांच्या जीवनमरणाचा विषय आहे त्यासाठी आंदोलन झालेतरी संरक्षण द्यायचे नाही असे आहे. भारत पाकिस्तान जोपर्यंत आहे तोपर्यंत अतिरेक्यांचा कायमचा धोका आपल्यावर राहणार आहे तरी यावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. अतिरेक्यांना लवकरात लवकर शासन व्हायला पाहिजे. त्यांना दहा-पंधरा वर्षे जीवदान दिले जाते. २६/११ चा हल्ला झाल्यानंतर श्रध्दांजली वाहिल्यानंतर सूचना केल्या तसेच जकातीमध्ये आपल्या कर्मचा-यांवर हल्ला झाला फक्त सुचना

केल्या जातात. ज्याठिकाणी जास्तीत जास्त नागरीक आहेत, वर्दळीचा भाग आहे त्याठिकाणी ते हल्ले करत असतात. त्यावेळेला आम्ही सूचना केली होती आपल्या महापालिकेमध्ये जकातनाक्यावर बंदुकधारी पोलीस नेमावेत, काही रिटायर्ड फौजी नेमावेत. आज त्याठिकाणी कुठेही बंदुकधारी दिसत नाहीत वेगवेगळया संघटनेचे लोक आपल्या येथे येतात. अतिरेकी जास्तीत जास्त गर्दीच्या ठिकाण टार्गेट करत असतीलतर, महापालिकेची इमारत असेल, भाजीमंडई असेल, उदयान असेल अशाठिकाणी चोख सुरक्षा यंत्रणा पुरविण्याची आवश्यकता आहे. आपल्या शहरातील नागरीकांना सुरक्षा मिळाली पाहिजे. महापालिकेची इमारत आहे याठिकाणी सुध्दा बंदुकधारी सुरक्षा रक्षक देणे आवश्यक आहे. या सगळया सुचना होत असताना या सगळया गोष्टीवर गांभीर्याने विचार करावा. जे निरपराध लोक बळी गेलेले आहेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. उल्हास शेट्टी यांनी अतीशय चांगली सूचना केलेली आहे. त्याठिकाणी जो रिक्षावाला होता तो ठार झालेला आहे, अत्यंत गरीब कुटूंबातील व्यक्ति आहे त्यास आर्थिक मदत करावी अशी सूचना केलेली आहे, त्याच्या कुटूंबास आर्थिक मदत करायची का याबाबतीत गांभीर्याने विचार करुन तशी मदत करावी. पुन्हा एकदा श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब,परवा पुण्यामध्ये जो बॉम्बस्फोट झालेला आहे त्याचा सभागृहाच्या वतीने निषेध करतो. आपल्या महापालिकेतील कर्मचारी माऊली लांडगे यांचे काही दिवसापुर्वी निधन झालेले आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करतो. आज सभागृहामध्ये सर्वानी आपआपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. प्रत्येकाला वाटते जे झालेले आहे त्यावर काहीतरी केले पाहिजे, सुरक्षेच्या दृष्टिने पाऊल उचलले पाहिजे. दहशतवाद हा जगामध्ये फोफावलेला आहे हा प्रॉब्लेम फक्त पुण्यापुरता, महाराष्ट्रापुरता,देशापुरता मर्यादीत नसून सर्व जगाला दहशतवादाचा धोका निर्माण झालेला आहे. काही दिवसापूर्वी पुण्यामध्ये पोलीस आयुक्तांनी सुध्दा पोलीस यंत्रणा किती अपुरी आहे याबद्यल सांगीतले होते. पिंपरी चिंचवडची लोकसंख्या आणि पुण्याची लोकसंख्या यांना संरक्षण देण्यासाठी पोलीस यंत्रणा किती अपुरी आहे हे सांगीतलेले होते. त्यावेळेला पवारसाहेबांनी त्यांच्या भाषणामधुन सांगीतले, पत्रकाराना,मिडियावाल्यांना आवाहन केले की याबाबतीत पेपरला माहिती देऊ नका किंवा छापू नका. आपण पुर्णपणे पोलीसांवर अवलंबून राहू शकत नाहीत यासाठी प्रत्येकाला स्वत:हून काहीतरी करण्याची गरज आहे. मोठमोठे हॉटेल आहेत त्याठिकाणी गेल्यानंतर तपासणी केली जाते,गाडी चेक केली जाते त्यानंतरच गाडीमध्ये बसलेल्या लोकांना प्रवेश दिला जातो त्याठिकाणी मेटलडिटेक्टर असतो. तशाप्रकारे सर्वसामान्य लोकांनी सुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे. ज्यांचे दुकान आहे, हॉटेल आहे त्यांनी त्याठिकाणी किमान एक माणुस सुरक्षेच्या दृष्टिने ठेवणे आवश्यक आहे. तशी विनंती आपण हॉटेलमालकांना, व्यवसाय करणा-या लोकांना ज्याठिकाणी गर्दी आहे तेथे करावी. उदाहरण म्हणून सांगतो प्रदीप स्वीट मार्ट त्याठिकाणी कायम गर्दी असते, त्याठिकाणी मालकांना सांगावे एखादा गार्ड

ठेवावा. पोलीस यंत्रणा एवढे काम करु शकणार नाही कारण दहशतवादाचा जगाला धोका निर्माण झालेला आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांनी याविरुध्द आवाज उठविला पाहिजे प्रत्येकांनी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पोलीस यंत्रणा,गुप्तचर यंत्रणा यांनी त्यांचे काम केलेच पाहिजे. त्यापेक्षाही आपण आपल्या परीने काय करु शकतो, आपल्याला काही करता येईल का याचा प्रत्येकानी प्रयत्न केला पाहिजे आपण आपल्या परिसरासाठी काही सुविधा देवू शकलोतर निश्चितपणे शहराच्या सुरक्षेच्यादृष्टिने प्रत्येकजण काहीना काही करु शकेल. पुण्यामध्ये झालेल्या बॉम्बस्फोट हल्ल्याचा निषेध व्यक्त करतो.

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, बॉम्बस्फोट हल्याचा तीव्र निषेध करते आणि मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तिना श्रध्दांजली वाहते. यापुर्वी दिल्लीला बॉम्बस्फोट हल्ले होत होते आता आपल्या पुणे शहरात ही घटना घडलेली आहे. सगळयांनी काळजी घ्यायला पाहिजे. संशयास्पद व्यक्ति असेल त्याची हालचाल संशयास्पद असेलतर त्याकडे लक्ष द्यायला पाहिजे. शहरासाठी स्वतंत्र गुप्तचर यंत्रणा असेल याबाबतीत शहराची सुरक्षा कशी व्यवस्थीत राहिल याचा प्रयत्न केला पाहिजे.

मा.महापौर :- १३/२ ला जो अतिरेकी हल्ला पुण्यामध्ये झालेला आहे त्या अतिरेक्याचा त्यांच्या त्या प्रवृत्तीचा निषेध करतो. सर्व नागरीकांना आवाहन करतो की आपण आपले कर्तव्य पार पाडतो आहोत का याचे आत्मपरिक्षण केले पाहिजे. पोलीस यंत्रणा किंवा सुरक्षा यंत्रणेला जबाबदार धरु शकत नाहीत ते त्यांचे काम करतात. परंतु आपण आपले काम करतो आहोत का हे बघावे. अनेक मान्यवरानी वेगवेगळया सुचना केलेल्या आहेत. त्यादृष्टिने मला नागरीकांना सूचना करायची आहे की अनोळखी व्यक्ति आढळलातर त्याची सूचना पोलीसांना देणे आवश्यक आहे. आपण भाडेकरु ठेवतो त्याचा फोटो, माहिती,पत्ता पोलीसाना दिला पाहिजे. घर ताब्यात द्यायच्या अगोदर त्याची पुर्ण माहिती त्याच्या फोटोसह घेणे गरजेचे आहे व ते केलेच पाहिजे. त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी काही बॅग वगैरे पाहिलीतर पोलीसाना कळविले पाहिजे. आपण जे करायला पाहिजे ते करावे. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दि. १५.०२.२०१० रोजी दुपारी ३.१५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४३

## सभावृत्तांत

(दि.१५.०२.२०१० (दु.२.०० ) ची तहकूब सभा)

दिनांक :- १५.०२.२०१० वेळ :- दुपारी ३.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१५.०२.२०१० (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक १५.०२.२०१० रोजी दुपारी ३.१५ वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर

२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर

३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा

४. मा.जाधव विजया अशोक (मामी)

५. मा.थोरात एकनाथ दादा

६. मा.दत्तात्रय बाबुराव साने

७. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव

८. मा.बो-हाडे शरद परशुराम

९. मा.डॉ. सौ. मीना पाटील

१०. मा.खेडकर घनशाम रामचंद्र

११. मा.कुंभार रामदास तानाजी

१२. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१३. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१४. मा.अजित दामोदर गव्हाणे

१५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१६. मा.महेश किसन लांडगे

१७. मा.मोहिनी विलास लांडे

१८. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

१९. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२०. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२१. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२२. मा.डॉ.वैशालीताई  घोडेकर

२३. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२४. मा.यशवंत भोसले

२५. मा.कदम निर्मला सदगुरु

२६. मा.काळूराम मारुती पवार

२७. मा.आझम फकीरभाई पानसरे

२८. मा. चांदगुडे महेश गंगाराम

२९. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३०. मा.भापकर मारुती साहेबराव

३१. मा.शेट्टी जगदिश

३२. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३३. मा.बोबडे  भिमा  सखाराम

३४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

३६. मा.उबाळे  वैशाली  संजय

३७. मा.सुमनताई  मधुकर पवळे

३८. मा.कुमार आर. एस.

३९. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४०. मा.उल्हास शेट्टी

४१. मा.जावेद शेख

४२. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४३. मा.कुटे गोपाळ नाना

४४. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४५. मा.भोंडवे तुकाराम महादू

४६. मा.खानोलकर मनोज विक्रम

४७. मा.गणेश तुकाराम भोंडवे

४८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

४९. मा.वाघ रघुनाथ दलपत

५०. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५१. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५२. मा.आण्णा दादू बनसोडे

५३. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५४. मा.बाराहाते शरद भगवंतराव

५५. मा.अपर्णा निलेश डोके

५६. मा.गावडे  जयश्री वसंत

५७. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

५८. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

५९. मा.रामआधार धारिया

६०. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६१. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६३. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६४. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६५. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

६६. मा.भारती ज्योती सुखलाल

६७. मा.कोकणे संतोष अंकुश

६८. मा.सुतार विजया विजय

६९. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७०. मा.बारणे संतोष नागु

७१. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७२. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

७३. मा.कलाटे कमल तानाजी

७४. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७५. मा.खोमणे लता हनुमंत

७६. मा.प्रशांत शितोळे

७७. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

७८. मा.अशोकभाई सोनवणे

७९. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८०. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८१. मा.जगताप शंकर पांडुरंग

८२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८३. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८४. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८६. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८८. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

८९. मा.फुगे सुनंदाताई विजय

९०. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

९१. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९२. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९३. मा. विनायक सुरेश रणसुभे

९४. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

९५. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख मा.पवार, मा.कारचे, मा.फडणीस,मा.गावडे, मा.गायकवाड, मा.भोसेकर-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता, मा.पाटिल-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.जाधव, मा.चव्हाण-कार्य.अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.फुगे-मुख्य आयातकर अधिक्षक, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रविण गोविंद नेवाळे यांचा बांगलादेश येथे होणा-या अंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता भारतीय कबड्डी संघाच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्यल व सय्यद इफ्तेकार युसूफ ड प्रभागातील उपअभियंता यांचे चिरंजीव डॉ. सय्यद सुहेल इफ्तेकार यांचा वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनात्मक लेखनाबद्यल सत्कार करण्यात आला.)

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, आताच आपण याठिकाणी आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडू प्रविण नेवाळे यांचा सत्कार केला. प्रविण हा शेतकरी कुटूंबातील चिखली गावातील खेळाडू आहे. त्यांने ब्रम्हा,विष्णू,महेश या संघाच्या वतीने कबड्डी या खेळाला सुरवात केली. पहिल्यांदा त्यानी कॅप्टन म्हणून सूरवात केली. पंधरा-सोळा वर्षापुर्वी राजू घुले यांचे इंडिया टिममध्ये सिलेक्शन झाले होते त्याच्यानंतर हा बहुमान मिळालेला आहे. बांगला देशामध्ये अांतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत त्यांनी चांगल्या पध्दतीने खेळ करुन भारताला सुवर्ण पदक मिळालेले आहे. मी विनंती करतो की अशा खेळाडूचा सन्मान करतांना ५ लाखाचे

अनुदान देऊन सन्मानीत करावे. या अगोदर सर्व खेळाडूना महापालिकेच्या माध्यमातून मदत केलेली आहे. हा खेळाडू पिंपरी चिंचवड शहरातील आहे याचा विचार करावा.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, आमचे सहकारी मित्र महेश लांडगे यांनी प्रविण नेवाळे यांना ५ लाखाचे अनुदान द्यावे अशी सूचना मांडलेली आहे त्याला मी अनुमोदन देतो.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, कबड्डी या खेळात पुणे जिल्हयामध्ये पिंपरी चिंचवडचे नाव पुर्वीपासून आहे. या परिसरामध्ये ज्या ज्या ठिकाणी जाल त्या त्याठिकाणी कबड्डी खेळाची मुले मिळतात. पुणे जिल्हयामध्ये, महाराष्ट्र राज्यात त्यांनी नाव कमावलेले आहे. पहिल्यांदा महाराष्ट्राचा कॅप्टन पिंपरी चिंचवडचा होतो आहे आणि इंडिया टिममध्ये जाणारा हा खेळाडू आहे. याच्या अगोदर राजू घुले होता. हा पिंपरी चिंचवडचा पहिला खेळाडू आहे. महेश लांडगे यांनी सूचना केलेली आहे ५ लाख अनुदान दयावे त्याऐवजी २ लाख ९० हजार अनुदान देणेत यावे. आपण ब-याच लोकांना अनुदान देत असतो. आपण कुठलेही पदक मिळत नाही अशी टिका करत असतो व जे खेळाडू खेळतात त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. प्रशासनाने हा विषय मंजूर केल्यानंतर त्यांच्या हातात लवकरात लवकर हे मिळाले पाहिजे अशा पध्दतीने कार्यवाही करावी.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, प्रविण नेवाळे यांचा आताच सन्मान झाला आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून महापालिकेच्या वतीने अनुदान दयावे अशी महेश लांडगे यांनी सूचना केली आहे मी सुध्दा पाठिंबा देतो. खरेतर आपल्या शहरातील तरुण कबड्डी क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पातळीवर गेलेला आहे. एका गोष्टीची आठवण करुन देतो, या सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय खेळाडूची रक्कम मंजूर केल्यानंतर भविष्यामध्ये असे होऊ नये की २ लाख ९० हजार किंवा महेश लांडगे यांनी सांगीतल्याप्रमाणे ५ लाख अनुदान मंजूर केले तर पिंपरी चिंचवड महापालिका त्या खेळाडूस अनुदान देत नाही. कारण या अगोदर असे झालेले आहे. कार्तिकी गायकवाड हिला अनुदान देण्याच्या संदर्भात घोषणा केली होती परंतू त्यांची फार ससेहोलपट झाल्यानंतर पेपरमध्ये बातमी आल्यानंतर पैसे दिले आहेत. त्याचप्रमाणे या शहरामध्ये बिबटया आला होता आपले कर्मचारी नेवाळे यांनी त्याला पकडण्याचे धाडस केले त्याबाबतीत त्यांना ५० हजाराचे अनुदान देण्याची घोषणा केली परंतु आजपर्यंत ते दिलेले नाही. असे दुर्दैवाने एखादया खेळाडूच्या बाबतीत घडू नये म्हणून आठवण करुन देतो. आपल्या शहरातून चांगले काम होत आहे. खेळाडूना, गायीकेला किंवा धाडसी कर्मचा-याला पुन्हा एकदा वर्तमानपत्राकडे जाण्याचा योग येवु नये. आपले उपअभियंता श्री.सय्यद यांचे सुध्दा अभिनंदन करतो, त्यांच्या चिरंजीवाने आंतरराष्ट्रीय दर्जाची ख्याती मिळविलेली आहे त्यासाठी धन्यवाद देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, प्रविण नेवाळे हा स्पोर्टसमन आहे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची निवड झालेली आहे मनापासून अभिनंदन

करते. अनुदान मिळणार आहे परंतू आपण जे अनुदान देणार आहोत त्यामध्ये किती रक्कम शिल्लक आहे. ज्या अपंग संस्था असतील त्यांना देणार होतो परंतू १५ फेब्रूवारी पर्यंत फॉर्म सबमिट करावयाचे होते. उपेक्षीत घटकाना फॅार्म दिल्यानंतर अनुदान वाटप होणार आहे, तरी आता अनुदान किती शिल्लक आहे हे सांगावे. नाहीतर नेवाळेपर्यंत पोहचेपर्यंत अनुदान संपलेले असेल. ३० लाखाला धक्का न लावता हे अनुदान वाटप करायचे असे मागे ठरलेले होते. अंध/अपंग/मतीमंद या लोकांसाठी ठेवलेले आहे. तरी याचा खुलासा करावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, चिखली गावचे नेवाळे याना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये संधी मिळालेली आहे. त्यांना अनुदान देण्याबाबत आझमभाई पानसरे यांनी प्रस्ताव मांडला त्याला अनुमोदन देतो. मंगलाताई कदम यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मागच्या वेळेस मंडळाना अनुदान न देता शहरामधील अंध,अपंग संस्थेला अनुदान देण्याचे धोरण निश्चित केलेले होते. या संदर्भात आमच्या येथील शाळेनी मागणी करुन सुध्दा पैसे मिळालेले नाहीत फॅार्म वापस पाठविलेला आहे. आपण अशा संस्थेला अनुदान द्यायचे ठरविले त्यावेळेला प्रशासन सहकार्य करत नाही. गेल्या दोन वर्षाची माहिती मागविलीतर निश्चित असे लक्षात येईल की अनुदान दिले जात नाही. आता २ लाख ९० हजार अनुदान देण्याचे मंजूर केलेले आहे ते देण्यात यावे. आणि येथून पुढे अंध,अपंग या संस्थेतील मुलांना अनुदान देण्यात यावे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, महेश लांडगे यांनी ५ लाख बोलले आहेत आणि आझमभाई पानसरे यांनी संागीतले २ लाख ९० हजार दया तरी मंजूर करुन हा विषय संपवावा. जास्त चर्चा न करता २ लाख ९० हजाराला मान्यता दयावी आणि पुढची मिटिंग घ्यावी.

मा.महापौर :- विषयपत्रिका सुरु झालेली नाही आपली सूचना आहे त्याचा उपयोग नाही. हा विषय करुन घ्यायचा असेलतर दोन मार्ग आहेत एकतर स्थायी समिती मार्फत जीबीला विषय आणायचा अन्यथा आजच्या जीबी मध्ये अनुदानाच्या विषयाला उपसूचना देवून विषय करुन घ्यायचा.

मा.महापालिका सभा क्र.४२ दि.१९/०१/२०१० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.नगरसचिव :- विषय क्रमांक १ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मधे तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवुन नामनिर्देशनाद्वारे करणे.

[स्थायी समितीवर ८ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी - ६०, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस -

१९,भाजपा-शिवसेना फ्रंट आघाडी-१४, अपक्ष आघाडी-९, अपक्ष-२,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(अ) -१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने स्थायी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी - १०, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस-३,भाजपा-शिवसेना फ्रंट आघाडी-२,अपक्ष आघाडी-१ याप्रमाणात असल्याचे तसेच दिनांक १ मार्च २०१० रोजी दुपारी निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-४,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस-२, भाजपा-शिवसेना फ्रंट आघाडी-१ अपक्ष आघाडी-१ याप्रमाणे व दिनांक १ मार्च २०१० रोजी दुपारी निवृत्त न होणाऱ्या सदस्यांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-६, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस-१, भाजपा-शिवसेना फ्रंट आघाडी-१ अपक्ष आघाडी-०, याप्रमाणे पक्षांचे/गटांचे संख्याबळ असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता /विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) सुमनताई मधुकर पवळे, २) साळुंके राजेंद्र गुलाबराव, ३) वाघेरे प्रभाकर नामदेव, ४) थोरात एकनाथ दादा, ५) तानाजी विठ्ठल खाडे, ६) प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर, ७) गावडे जयश्री वसंत, ८) सौ.वर्षा विलास मडीगेरी या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर सदस्य म्हणुन नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहीर करण्यात आले. ]

-----------------

ठराव क्रमांक :- ८०६ विषय क्रमांक :- १

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :-मा. नगरसचिव

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/ नोंदणीकृत पक्षांचे / गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता / विरोधी पक्षनेता / पक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या / गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) सुमनताई मधुकर पवळे, २) साळुंके राजेंद्र गुलाबराव,३) वाघेरे प्रभाकर नामदेव, ४) थोरात एकनाथ दादा, ५) तानाजी विठ्ठल खाडे, ६) प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर, ७) गावडे जयश्री वसंत, ८) सौ.वर्षा विलास मडीगेरी या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर सदस्य म्हणुन नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

------------------------

(मा.महापौर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्थायी समितीवर सदस्य म्हणुन नियुक्त्या करणेत आलेल्या मा.सदस्यांचे अभिनंदन केले.)

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७८६ दि.१९/०१/२०१० अन्वये

पिंपरी चिंचवड मनपा परिवहन उपक्रमाकरिता आरक्षित असलेल्या तसेच मनपाच्या ताब्यात असलेल्या जागा / विकसीत मालमत्ता पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांना हस्तांतरण करणेकामी प्रस्तावात नमुद जागा/मालमत्ता यांचे चालू बाजारभावा प्रमाणे किंमत निश्चिती साठी बराच कालावधी लागणार आहे तथापि अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक पी एम पी एम एल यांची दि.२४/४/०९ व १२/५/०९ चे पत्रान्वये जागा/मालमत्ता मागणी विचारात घेता प्रस्तावात नमुद प्रमाणेचे क्र.१ ते ६ मधील आरक्षित जागा विकसित केलेल्या मालमत्ता या प्रस्तावात नमुद प्रमाणेचे अट क्र. १ ते ११ अटीनुसार तसेच दि.१९/४/०७ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे नियोजित कंपनी पी एम पी एम एल यांना चालू बाजार भाव नुसार मा.उपसंचालक नगररचना निश्चित करतील त्या मुल्यांकनास/किंमतीस अधिन राहून प्रस्तावा प्रमाणेच्या १ ते ६ मधील मनपा मालकीच्या व दिर्घ मुदत करारनामा व्दारे ताब्यात आलेल्या जागा/मालमत्ता कायद्याचे कलम ७९ (क) अन्वये तसेच परिवहन उपक्रमासाठी आरक्षित असलेल्या इतर मनपा मिळकती प्रस्तावाप्रमाणेचे मनपा अटीनुसार पी एम पी एम एल नावे हस्तांतर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत यावा.

मा.महापौर :- सदरचा विषय दप्तरी दाखल करण्यापेक्षा त्यांना पगारासाठी पैसे आपण देतो. महापालिकेनी स्वत: बीओटीवर विकसीत करावे अशी आपण सूचना केलीतर बरे होईल. त्यांना देण्यापेक्षा मोकळया जागा महापालिकेनी बीओटीवर

विकसीत केल्यातर त्यातून महापालिकेला निधी उपलब्ध होईल. त्यांच्याकडे पगार देण्यासाठी पैसे नाहीत आपणच विकसीत कराव्यात.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएल यांना देण्या ऐवजी मोकळया जागा मनपाने बीओटीवर विकसीत कराव्यात.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएल ला सुरवातीपासून माझा विरोध आहे. पीसीएमटी आणि पीएमटीचे एकत्रीकरण करत असताना सभागृहात मंजूरी देत असताना आम्ही त्याला विरोध केलेला आहे. गेल्या दोन-तीन वर्षात त्यांना पैसे दिलेले आहेत त्याची आकडेवारी सांगतो. जवळपास १९२ कोटी आपण पीसीएमटी ला दिलेले आहेत. पीएमपीएमएल २००८ मध्ये झाली, २००८ मध्ये १५ कोटी ५५ लाख अधिक २३ कोटी ४८ लाख, २००८-०९ ला २५ कोटी ५७ लाख, २००९-१० ला १४ कोटी ८२ लाख दिलेले आहेत. पीएमपीएमएल झाल्यानंतर महापालिकेनी जी रक्कम आदा केलेली आहे ती रक्कम ७० ते ८० कोटीच्यावर गेलेली आहे. पीसीएमटी स्थापनेपासून १९२ कोटी दिलेले आहेत. त्यात ८० कोटी पीएमपीएमएल झाल्यानंतर दिलेले आहेत. त्यांनी मागणी करायची आणि आपण द्यायचे. यामुळे महापालिका आर्थिक डबघाईला आलेली आहे. बीओटी बेसीसवर करायचे धोरण ठरल्यानंतर ती अमौंट पीएमपीएमएल ला देणार का? त्याचे सुध्दा धोरण ठरले गेले पाहिजे. बीओटीवर महापालिका जागा देते त्यांची मिटिंग वेगळी होते, तो विषय सभागृहामध्ये येणार नाही. आलेली रक्कम ही पीएमपीएमएल ला देणार का? यासाठीचे धोरण काय याचा सुध्दा खुलासा व्हायला पाहिजे. या जागेचे व्हॅल्यूएशन पाहिलेतर जवळपास शासकीय दराने ४० कोटीच्या भावामध्ये जाते. भोसरी डेपोची जागा १४,४१८ चौ.मी. आहे आणि भोसरीच्या मेनठिकाणी आहे. आजच्या प्रचलीत दराने बाजारभाव शासकीय रेटने धरलातर त्या जागेला त्यापेक्षाही जादा बाजारभाव येणार आहे. धोरण ठरवावे. कशाप्रकारे करणार याची सभागृहाला पुर्व कल्पना द्यायला पाहिजे. पीएमपीएमएलच्या कारभाराच्या बाबतीत शंकेचे कारण येते. त्यांच्या बॉडीवर आपले महापौर आहेत,स्थायी समितीचे चेअरमन आहेत,आपल्या महापौरांचा अभ्यास आहे काही महापौरांना काहीच माहिती नाही. महापालिकेची परिस्थिती ढासळलेली आहे. ती नियोजनशुन्य कारभारामुळे ढासळलेली आहे. पीएमपीएमएलचा घाईघाईने झालेला निर्णय संपूर्ण शहराला भोगावा लागतो कारण त्यांच्याप्रमाणे आपण ॲग्रीमेंट केलेले आहे. तीन वर्षात ८० कोटी त्यांना दिलले आहेत. भविष्यात या महापालिकेचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घ्यावा.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएल ला आपल्या जागा हस्तांतरण करण्याचा विषय आहे. ख-या अर्थाने हा विषय दप्तरी दाखल करणे

योग्य आहे त्याला उपसूचना दिलेली आहे. शहरात महापालिकेच्या भवितव्यासाठी मोकळया जागा येणा-या पिढयासाठी ठेवायच्या असतात. मध्यंतरी पीपीपीचा विषय होता आता हा विषय आला. या जागा हस्तांतरण किंवा बीओटी तत्वावर दिल्यातर विषय सभागृहासमोर येणार का. ती कमिटि परस्पर निर्णय घेईल. भविष्यामध्ये अशा पध्दतीच्या ओपन जागा राहणार का नाही. महापालिकेवर वाईट वेळ आलीतर, जकात बंद झालीतर महापालिकेच्या वतीने भाडेतत्वावर मल्टीप्लेक्स करुन त्यातूनतरी महापालिकेला उत्पन्न मिळू शकेल. येणा-या पिढयाचा विचार केला पाहिजे. आता सर्व जागा संपल्यातर, येणा-या पिढीसाठी किंवा जकात बंद झालीतर आमच्याकडे काय मार्ग आहे. नागरीकांवर कर लादून करणार आहात का? कर्मचा-यांचे पगार होतील का नाही अशी शंका आहे. भविष्यासाठी आपल्याला या जागा ठेवल्या गेल्या पाहिजेत. येणारी पिढी ठरवेल की ओपन प्लॉटवर काय करायचे आहे ते. त्या भाडयावर निदान महापालिकेचा खर्चतरी भागेल. कर्ज काढा पण जगवा असे चाललेले आहे. जगदीश शेट्टी यांना विनंती करेल की आपण मांडलेली उपसूचना शहराच्या दृष्टिने महत्वपुर्ण नाही. येणारी पिढी आपल्याला जाब विचारणार आहे. परस्पर काय व्यवहार होतात हे समजत नाही. येथून पुढे अशा पध्दतीच्या उपसूचना येऊ देऊ नका, जागा ठेवा. माझी जागा असेलतर मी लगेच विकायला काढत नाही अजून जास्त जागा माझ्याकडे कशा येतील हे बघतो आणि आपण या जागा विकतो हे योग्य नाही. पक्षनेत्यांनी केलेली उपसूचना माघारी घेवून विषय दप्तरी दाखल करावा.

मा.महापौर :- या सहा जागांवर डीपी मध्ये वाहनतळ,बसटर्मिनस,बसडेपो, बसस्थानक अशाप्रकारचे आरक्षण आहे. या मोकळया जागा ऑलरेडी आरक्षीत आहेत त्यामुळे पीएमपीएमएलच्या लोकांनी आपल्याकडे मागणी केलेली होती तसा प्रस्ताव आयुक्तांनी ठेवलेला आहे. कोणीही विकसीत केल्यातरी मुळ आरक्षण आपल्याला ठेवावे लागेल. २० टक्के देवून उर्वरीत कमर्शिअल करता येते. डीपीमधील आरक्षीत जागा आहेत. महापालिकेनी स्वत: विकसीत केल्यातर २० टक्के ॲकोमोडेशन रिझर्व्हेशन द्यावे लागेल. बीओटीवर झाल्यानंतर आरक्षण तसेच राहणार आहे. डेक्कनला बिल्डींग बांधलेली आहे तेथे खाली बसस्थानक आहे व वर कमर्शिअल आहे. तसे बसस्थानक त्यांना देवून कमर्शिअल महापालिका करेल.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, माझ्या मतदारसंघात पीएमपीएमएल चा डेपो होता त्याचे आरक्षण उठवून त्याठिकाणी गार्डन केले. यासंदर्भात मला सांगायचे आहे की हे आरक्षण उठलेले असताना तेथील डेपो का हालवत नाहीत अन्यथा माझ्यासारख्या सदस्यांना उपोषण करावे लागेल. आपण शब्द दिलेला आहे की हा डेपो उठविला जाईल आरक्षण उठलेले आहे परंतु अद्यापपर्यंत तो डेपो उठलेला नाही. हे कधीपर्यंत होईल ते सांगावे.

मा.महापौर :- हा ठराव ज्यावेळेला आणला होता त्यावेळेला तुम्हांला सहकार्य करुन आरक्षण उठविलेले आहे. त्याठिकाणी गार्डन आलेले आहे. आपल्या डीपी मध्ये असल्यामुळे त्यांना क्रमप्राप्त आहे की ते लवकरात लवकर खाली केलेच पाहिजे. पीएमपीएमएलच्या मिटिंग मध्ये त्यांनी विषय घेतलेला नाही मी हा विषय त्याठिकाणी घेणार आहे आणि हे करणार आहे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएल ला काही जागा विकसीत करण्यासाठी देण्याचा तीस-या वेळेस विषय आलेला आहे आणि आता अचानक सांगीतले आहे. या जागा बीओटीवर द्यायच्या आहेत दप्तरी दाखल करण्याचे प्रस्तावीत असताना अचानक तुमच्या मनात कसा काय विषय आला बीओटीवर देण्याचा.

मा.महापौर :- विषय करायचा असेलतरी किंवा नसेलतरी ते सभागृहाने ठरवायचे आहे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, बसल्याबसल्या तुम्ही विषय करु शकता, पक्षनेत्यांचा व्हीप बदलू शकता. सिटि सेंटरच्या विषयाला असेच केले आहे परत निवीदा काढाव्या लागल्या अजून तो घोटाळा चाललेला आहे. बीओटीचा विषय मंजूर झाल्यानंतर परत आमच्यापुढे येणार नाही. बीओटी कमिटिमध्ये विरोधीपक्षाचा एकही सदस्य नाही. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस यांची यूती आहे. शिवसेना आणि भाजप मधुन एकही सदस्य नाही. बीओटी सेलमध्ये भाई सोनवणे यांना घ्यावे असे त्यावेळेला सांगीतले होते ते घेतलेले नाही. आमचा याला विरोध आहे. २० टक्के मुळ आरक्षण आणि बाकीचे कमर्शिअल लेव्हलला डेव्हलप करणार आहेत असे आपण सांगीतले आहे. आपण बसल्या बसल्या हे गणीत केले आहे. हा विषय दप्तरी दाखल करावा, परत विषय आणलातर आम्ही पाठिंबा देऊ.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, वेताळनगर चिंचवड येथील १५९३१ चौ.मी. जागेचे रिझर्व्हेशन तुम्ही बदलले आहे, आता किती शिल्लक आहे, हे क्षेत्र त्याठिकाणी उपलब्ध नाही याचा खुलासा करावा.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, वेताळनगर येथे मुळ रिझर्व्हेशन १५९३१ चौ.मी.चे आहे त्यात ३३०० चौ.मी. जागा शिल्लक आहे.
मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, १५९३१ चौ.मी. जागा ही बसटर्मिनलसाठी डीपी प्लॅनमध्ये दाखवलेली आहे ते डीपी प्लॅन मध्ये दाखवलेले क्षेत्र आता त्याठिकाणी शिल्लक आहे किंवा नाही हे सांगावे.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, याच्यावर आपण स्लम स्किम करतो व उर्वरीत ३३०० चौ.मी. राहते.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, ती जागा ओपन त्याठिकाणी उपलब्ध आहे का ?

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, स्लम रिहॅबीटेशन स्किम करतो आहोत व बस टर्मिनलसाठी उपलब्ध क्षेत्र ३३०० चौ.मी. आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, नियमबाहय बांधकाम केलेले आहे हे आपण मान्य करतो का नाही हे सांगावे.

मा.महापौर :- मुळात ही जागा बसटर्मिनलसाठी होती त्यामध्ये झोपडपट्टी अतिक्रमण होते त्यावेळेला २.५ एफएसआय साठी आपणच ट्राय करत होतो त्याठिकाणी स्किम केलेली आहे ती करुन ३३०० चौ.मी.जागा बसटर्मिनलसाठी ठेवलेली आहे. आरक्षणावर झोपडपट्टी झालेली होती.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलच्या ज्या जागा आहेत त्या वर्ग करण्याचा विषय आहे. मुळ विषय असा असताना पक्षनेत्यानी अगोदर दप्तरी दाखल करावा अशाप्रकारचा विषय मांडला त्यानंतर तूम्ही सुचना केल्याप्रमाणे उपसूचना देण्याचा प्रयत्न केला. याठिकाणी बीओटीचे मोठया प्रमाणात पीक यायला लागलेले आहे. महापालिकेचा आराखडा तयार होतो, निरनिराळे आरक्षण त्यामध्ये असतात. महापालिकेच्या जागेत वेगवेगळे प्रकल्प असतात, अलीकडच्या काळामध्ये बीओटी प्रकल्प होतात त्याला सुध्दा मर्यादा असाव्यात. आपण नुसते बीओटीवर प्रकल्प करायला लागलोतर या शहराची अवस्था काय होईल. आज आपण शहरातील १०५ विश्वस्त आहोत. भविष्यात अनेक सदस्य येणार आहेत. शहरातील नागरीक जाब विचारणार आहेत. सर्व पीपीपी,बीओटीवर करणार असूतर स्थानीक स्वराज्य संस्था म्हणून काही अस्तित्व राहणार की नाही. आपल्याला उत्पन्नाचे आर्थिक स्तोत्र पाहिजे, आपली आर्थिक स्थिती खराब आहे. विकास कामाला पैसे हवेत. आपण आपले आंथरुण पाहून पाय पसरले पाहिजेत. आपण कोंबडी कापायला नाही पाहिजे, अंडयावर गाडा चालविला पाहिजे. आपण फक्त फायदा तोटा पाहणार असूतर महापालिकेच्या इमारतीवर चार एफएसआय करुन ही इमारत भाडयाने देणार का. महापालिकेची इमारत बीओटीवर देवू असे आपण म्हणत असूतर ते दुर्दैव आहे. आपण शहराच्या भविष्याचा वेध घेवून शहराचा विकास केला पाहिजे. बीओटी कमिटिचे आपण अध्यक्ष आहात. माझ्या वॉर्डातील बीओटीचा निर्णय आपण रद्य केला आहे मी नागरीकांच्या वतीने आपले अभिनंदन करतो. संपुर्ण शहराचा प्रतिनिधी म्हणून सांगतो बीओटी संदर्भात आपण जो निर्णय घेतो तो निर्णय या शहराला खड्डयात लोटणारा आहे, नागरी जीवन उध्दवस्त करणारा आहे आपण तशाप्रकारचे धोरण राबवू शकत नाही. तुम्ही महापौर आज आहेत उदया नसाल, नगरसेवक आज आहात उदया नसतील, आयुक्त काही दिवस राहतील परत ते दुसरीकडे आयुक्त म्हणून

जातील परंतू ही संस्था आणि या शहरातील नागरीक येथे कायम राहणार आहेत म्हणून व्यापक दृष्टिकोन ठेवून सोन्याचे अंडे देणारी कोंबडी कापू नका, फक्त अंडे घ्या.आपण सगळे विकायला लागलोतर कसे होईल. ही काही लॅण्ड विकणारी महापालिका नाही. ९९ वर्षानंतर आपण कोणीतरी असू का. कमर्शिअल माईंडचे काही लोक असतीलतर माझी विनंती राहिल की या शहराच्या भविष्याचा विचार करुन शहराचे भविष्य उज्वल कसे होईल असा निर्णय घ्यावा. हा किरकोळ विषय नाही. घाईघाईने निर्णय घेणार असालतर आमचा विरोध राहणार आहे, आपण तसे करु नका. बीओटी,पीपीपी वर विशेष सभा बोलवावी. आपण शहराचा व्यापक विचार करणारे महापौर आहात, भविष्याचा विचार करुन योग्य निर्णय घेणारे महापौर आहात.

मा.जगदीश शेट्टी :- विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- तूमच्या म्हणण्यानुसार अंडेही फोडत नाही आणि कोंबडीही कापत नाही. यावर अभ्यास करुन यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८०७ विषय क्रमांक :- २

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७८६ दि.१९/०१/२०१० अन्वये

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८/१२/०९

२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२३३

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१२ दिनांक १६/१/२०१०

स्थापत्य विभागाकडील "असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर" पदाची आवश्यकता विचारात घेता, महापालिका आस्थापनेवरील सदर पदाची - "वेतनश्रेणी : र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ५४०० भरतीप्रमाण : १००% सरळसेवेने शैक्षणिक अर्हता : १)स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी B.E. [civil] २)महापालिकेतील अभियांत्रिकी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव ३) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरींग मधील पदवीव्युत्तर पदवी असणे आवश्यक ४) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक", याप्रमाणे वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खरेतर महापालिका आर्थिक संकटात असताना पदाची निर्मिती का करतो याचा खुलासा करावा. असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर या पदाची आवश्यकता का भासली, यासंदर्भात माहिती द्यावी.

मा.देशमुख :- मा.महापौर साहेब, असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर हे पद ऑलरेडी मंजूर आहे. आता जो विषय आहे तो अर्हता बदलायचा आहे. २१.१२.१९९१ पासुन हे पद मंजूर आहे,आता फक्त अर्हता बदलायचा विषय आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब,आपल्याकडे माणसे शोधली की पदाची निर्मिती होते. या पदावर गायकवाड बी.के. यांची नियुक्ती होणार आहे. स्थापत्य अभियंता म्हणून ८७ साली ते लागल्यानंतर २००८ मध्ये महापालिकेनी त्यांना दोन वर्षाची रजा दिली, आय. आय.टी. याठिकाणी प्रशिक्षणाला पाठविले. दोन वर्षे पुर्ण झाल्यानंतर आता पदावर आल्यानंतर महापालिकेला वाटू लागले त्या पदावर बसणारा माणूस लायक झाला म्हणून हे पद भरण्याची घाई चाललेली आहे. माणुस डोळयासमोर ठेवून पदाची निर्मिती होते. ९१ पासून पद रिक्त होते, इतर पदे भरली जातात हे पद का भरले नाही. या पदावर लायक माणूस नव्हता का?

का रिक्त ठेवले, आताच का घाई वाटली. असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर पदाची वेतनश्रेणी १५६००-३९१०० अशाप्रकारची केलेली आहे. सभागृहात आपण सुध्दा अनेकवेळा बोललात. शेवटी आपल्या खीशामध्ये किती आहे हे पाहिले पाहिजे. मी नाव घेतलेले आहे गायकवाड नावचा माणुस त्याठिकाणी बसेल, नक्कीच त्या माणसासाठी पदाची निर्मिती याठिकाणी होत आहे.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, आताच असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर पदाची आवश्यकता का भासली. १९९१ साली पद मंजूर झाले आज २०१० चालले आहे, इतक्यावर्षे महापालिकेला या पदाची आवश्यकता नव्हती का. आत्ताच का लागली. आताच सांगीतले आहे गायकवाड नावचा माणूस दिल्लीला प्रशिक्षण घेवून आला आहे. पीएमपीएमएलला जागा विकणार आहोत आता राहिले काय. महापालिकेची बिल्डींग आणि अ,ब,क,ड प्रभाग. हा विषय फेटाळण्यात यावा. ९१ सालापासून हे पद रिक्त आहे. अशा एकूण किती जागा खाली आहेत, बाकीच्या सुध्दा जागेची भरती करावी. या माणसाने दिल्लीमध्ये जावून दोन वर्षे प्रशिक्षण घेतले आहे. हे स्थापत्य विभागाचे पद आहे. अशा किती खात्यामध्ये ९१ सालापासून जागा खाली आहेत याचा खुलासा करावा. पाणीपुरवठा, नगररचना, आरोग्य विभागामध्ये वर्ग ३,४ च्या किती जागा खाली आहेत याची माहिती दयावी.
मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, १९९१ ला पद मंजूर असताना २०१० ला भरायचे आहे प्रशासनाचे कौतूक करावे तेवढे कमी आहे. शहराच्या अकृतीबंधानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेला किती कार्यकारी अभियंत्यांची गरज आहे आणि आपल्याकडे किती कार्यकारी अभियंता काम करतात व किती पदे रिकामे आहेत याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर :- श्रीरंग बारणे यांनी सांगीतलेली माहिती योग्य आहे. हा व्यक्ति क्वॉलीफाय आहे त्यांनी आयआयटी केलेले आहे तो कॅपेबल आहे, आपण पद निर्माण केले होते. मुंबई-पुणे हायवे अनेक वर्षे आपल्या ताब्यात येत नव्हता, बीआरटी रोड आहेत त्यासाठी हे पद भरायचे आहे असे वाटते. सभागृहाला वाटले हो तर ठिक आहे नाहीतर विषय तहकूब ठेवा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पद निर्माण केले किंवा त्याठिकाणी बसविलेतरी मला काही हरकत नाही. हे काय काम करतात, सर्व काम कन्सलटंट करतात, बील तेच करतात आपले अभियंते फक्त बीलावर सहया करण्याचे काम करतात. महापालिका आर्थिक संकटात असताना पदनिर्मिती करतो आहोत महापालिकेच्या तिजोरीचा सुध्दा विचार केला गेला पाहिजे. पद निर्माण केल्यानंतर तो माणूस त्याठिकाणी बसल्यानंतर महापालिकेला झळ पोचणार आहे. भविष्यामध्ये काही गोष्टीला लगाम दिला पाहिजे जेणेकरुन महापालिका आर्थिक संकटात सापडणार नाही. हे पद भरल्यानंतर डीपी चेंज करणार का. ते कॅपेबल

असलेतरी भविष्यातील महापालिकेचा विचार करावा हे नाव माझ्याकडे आल्यानंतर मी येथे सांगीतलेले आहे.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब बाकीच्या किती जागा खाली आहेत हे सांगावे.

मा.महापौर :- आपल्याकडे नॉर्म्सप्रमाणे किती कार्यकारी अभियंता आहेत आणि किती लागणार आहेत, अशा पध्दतीच्या पदाची आवश्यकता आहे का याचा अभ्यास करुन पुढच्या वेळेस विषय आणावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, हे पद आतापर्यंत का भरले नाही,प्रशासनाने उत्तर दयावे. ज्याना प्रमोशन देणार त्यांना सिलेक्ट करुन दिल्लीला पाठविलेले आहे. आता त्यांना प्रमोशन दयावे. महापालिकेनीच दिल्लीला दोन वर्षे ट्रेनींगसाठी पाठविलेले आहे, खर्च सुध्दा महापालिकेनी केलेला आहे.

मा.महापौर :- पद मंजूर आहे, खर्च महापालिकेनी केलेला आहे. किती इंजिनिअरची आवश्यकता आहे हि माहिती विचारलेली आहे.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, विषय संशयास्पद का येतो. थेट आम्ही आमचा माणूस ट्रेनिंगला पाठविलेला आहे असा विषय सभागृहामध्ये यायला पाहिजे होता.

मा.महापौर :- पदाची अर्हता बदलतो आहोत व्यक्तिचे नाव येणार नाही. पद मंजूर करुन घेतलेले आहे. आता त्या पदाची आपल्याला गरज आहे महापालिकेनी खर्च केलेला आहे त्याला घ्यायचे झालेतर त्याच्याकडे जी अर्हता आहे त्याला महापालिका जोपर्यंत मंजूरी देत नाही तोपर्यंत नावानिशी विषय येणार नाही.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, महापालिकेच्या खर्चाने प्रशिक्षणाला गेलेले असतील आणि नावानिशी पद देत असूतर नावानिशी प्रस्ताव यायला काय हरकत आहे.

मा.महापौर :- या व्यक्तिची भविष्यामध्ये रिक्वॉयरमेंट आहे, पुढच्यावेळेस अभ्यास करुन विषय येऊ दयावा.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८०८ विषय क्रमांक :- ३

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८/१२/०९

२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२३३

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१२ दिनांक १६/१/२०१०

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.एकनाथ मोटे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...

२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२४४

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१३ दिनांक १६/१/२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रणाकरीता पर्यावरण विभाग कार्यरत आहे. ७४ वी भारताची घटनेची दुरुस्ती नुसार पर्यावरण संरक्षणासाठी सध्या केंद्रशासन व महाराष्ट्रशासनाकडुन विशेष प्राधान्य दिले आहे. त्या आधारे मा.आयुक्त यांच्या आदेश क्र.प्रशा/१/कावि/१३१३/२००९ दि.१६/११/२००९ अन्वये पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष स्थापन झाला आहे. सदर कक्षाचे कामकाज कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता पर्यावरण संवर्धन अधिकारी म्हणुन कामकाजाची जबाबदारी असणा-या सक्षम अधिका-याची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण/१००५/वर्गीकरण/प्रक्र/३७९/०५/नावि२४ मंत्रालय मुंबई दि.०४/०५/२००६ नुसार परिशिष्ट २ मधील अनुक्रमांक २९ अन्वये पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. सदर शासन निर्णयानुसार पुणे व कोल्हापुर महानगरपालिका यांनी पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करुन भरले आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (पर्यावरण) तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी या अभिनामाचे पद निर्माण करावे व त्याची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, अनुभव, पात्रता व पद भरावयाची पध्दत सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ठेवावी. सदर कार्यकारी

अभियंता (पर्यावरण) तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी या अभिनामाचे पद निर्माण करण्यास व भरण्यास मान्यता देणेत यावी त्याचप्रमाणे मनपा अधिनियमातील सुधारणा सन २००८ - ०९ अंतर्गत स्ट्रक्चरल ऑडीट करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी स्ट्रक्चरल इंजिनियरींग मधील अर्हता (शैक्षणिक अर्हता एम.टेक [सिव्हील स्ट्रक्चरल इंजिनियरिंग]) प्राप्त असलेल्या मनपातील अनुभवी व पात्र उमेदवाराची स्ट्रक्चरल डिझाईनर अथवा स्ट्रक्चरल ऑडिटर म्हणून नेमणुक र.रु.१५६००- ३९४०० ग्रेड पे ५४०० अन्वये करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, विषय मंजूर करावा.नदीपात्रा मध्ये शेवाळे साठलेले आहे. आयुक्तांनी त्याठिकाणी जावुन पाहणी दौरा केलेला आहे. एकाच अधिका-यावर भार पडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८०९ विषय क्रमांक :- ४

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.एकनाथ मोटे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२४४
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१३ दिनांक १६/१/२०१०

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१० विषय क्रमांक :- ५

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/वि/१६/१०

दि.११/१/१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२३९ दिनांक १६/१/२०१०

प्रस्तावाप्रमाणे पाणीपुरवठा अ प्रभाग, क प्रभाग पाणीपुरवठा या विभागाकडील लेखाशिर्षावरुन एकुण र.रु.१,००,००,०००/- तरतुद शुद्ध/अशुद्ध जलउपसा केंद्र से.२३ (चालू भांडवली अत्यावश्यक कामे) व शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र (देखभाल दुरुस्ती) यासाठी प्रस्तावाप्रमाणे अत्यावश्यक कामांवर वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८११ विषय क्रमांक :- ६

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/वि/१८/२०१०
दि.११/१/१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२६८ दिनांक १६/१/२०१०

म.न.पा.चे सन २०१०-११ मुळ अंदाजपत्रक तयार करतेवेळी जलशुद्धीकरण केंद्र से.२३ विद्युत विभागाचे “शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र” लेखाशिर्षावरील “देखभाल दुरुस्ती” हे लेखाशिर्ष भांडवली खर्चाऐवजी महसुली खर्चात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१२ विषय क्रमांक :- ७

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.जगदीश शेट्टी, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२८९ दिनांक १६/१/२०१०

खालील नमुद केलेले कामाचे नाव सन २००९ - १० या आर्थिक वर्षामध्ये नसुन तरतुद उपलब्ध नाही.

| अ क्र | कामाचे नांव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकातील पान क्र./अ.क्र. | सन २००९-१० मध्ये असलेली तरतूद र.रू. | सन २००९-१० मध्ये आवश्यक र.रू. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महापौर चषक राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा २००९ च्या अनुषंगाने मैदान दुरुस्ती, स्टेज, मंडप, गॅलरी इ. कामे करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल | नवीन काम | ० | २०,००,००० | २०,००,००० | -- |
| २ | दळवीनगर ते चिंचवड १८ मी डी पी रस्ता करणे. | विशेष योजना | २५/३३ | २,०८,२८,००० | १,८८,२८,००० | ० | २०,००,००० |

तरी वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, क्रिडाविषयक या ठिकाणी तरतूद आहे. आपण या सर्व तरतूदी करण्याबद्यल मनापासून स्वागत करतो. आपण ब-याचशा व्यायामशाळा या होतकरु मुलांना आधार मिळावा म्हणून

चालविण्यासाठी दिलेल्या आहेत काही व्यायामशाळा महापालिकेच्या ताब्यात आहेत. आपण खर्च करत असताना अशा ज्या आदर्श व्यायामशाळा आहेत महापालिकेच्या ताब्यात असून सुध्दा चांगल्या पध्दतीने त्या चालतात त्याठिकाणी महिला भगिनीसाठी सुध्दा स्वतंत्र कक्ष करता येईल आमच्या परिसरातील नियोजन दिलेले आहे. तरतुद नसल्यामुळे विलंब झालेला आहे. यानंतरच्या काळामध्ये आदर्श व्यायामशाळा व ज्याचा नावलौकिक आहे अशाना आम्ही मागणी केल्याबरोबर पुरवठा करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६०                                                  प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१३                                        विषय क्रमांक :- ८

दिनांक :-१५.०२.२०१०                                      विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२९० दिनांक १६/१/२०१०

श्री.हनुमान मंदीर सेवा ट्रस्ट हे वारकरी विद्यार्थ्यांचा ऋषीकेष येथील शिक्षणाचा खर्च स्वतः करीत असल्याने त्यांस मनपा तर्फे र.रू.३,५१,०००/- अनुदान हनुमान मंदीर सेवा ट्रस्टच्या नावे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय फेटाळण्यात यावा.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, ज्या अपंग संस्था आहेत त्या संस्थाना सुध्दा अनुदान मिळाले पाहिजे. आंतरराष्ट्रीय खेळाडू नेवाळे यांचा विषय २ लाख ९० हजाराचा आहे. अपंग संस्थाना सुध्दा २ लाख ९० हजार मिळु शकतात. ज्या संस्थांचे अर्ज १५ तारखेला जमा झाले आहेत त्यांना सुध्दा रक्कम देता येईल.मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते- पिंपरी चिंचवड शहरात अपंग, मुकबधीर, मतिमंद, अंध व उपेक्षितांसाठी कार्यरत असणाऱ्या व मनोभावी सेवावृत्तीने समाजसेवा करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याने खालील संस्थांना अनुदान वितरणाबाबतच्या अटी व शर्ती शिथील करुन अनुदान मंजूर करण्यास १) साई

संस्कार संस्था, ब्रम्ह विष्णू महेश कबड्डी संघ, चैतन्य महिला मंडळ व आनंदवन कृष्ठ वसाहत यांना प्रत्येकी र.रु.२,९०,०००/- २) पिंपरी चिंचवड अपंग मित्र मंडळ व हॅन्डीकॅप सोशल ॲन्ड स्पोर्टस् फौंडेशन यांना प्रत्येकी र.रु.२,००,०००/- [सदर संस्थांनी अनुदान प्राप्तीसाठी मनपाकडे अर्ज सादर केले आहेत] याशिवाय अर्ज सादर केलेल्या संस्थांना उर्वरित रक्कमेतून समान अनुदान देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब,उपसूचनेला अनुमोदन देते.

मा.विनायक रणसुभे :- उपसूचना स्विकारली आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, महापालिका अनुदान देते. त्यावेळेला मी प्रस्ताव मांडला होता सर्वानी त्याला मान्यता दिलेली होती. नगरसेवकांच्या मर्जीतल्या मंडळाना देण्यापेक्षा ज्या अंध,अपंग,मुकबधिर अशा संस्था आहेत त्यांना आयुक्तांच्या अधिकारामध्ये सर्व अटि शिथिल करुन अनुदान दयावे. परंतू त्यामध्ये सुध्दा हॅरेसमेंट केली जाते. ब-याचशा संस्था अशा आहेत की त्यांचे ऑडीट असते. माझ्या माहितीप्रमाणे हा ठराव केवळ मानवतेचा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून केलेला आहे. आमच्या आमच्यामध्ये वाद होऊन संस्थेला अनुदान सन्मानाने देण्याकरिता दिरंगाई झालेली आहे. आतापर्यंत आयुक्तांनी आपल्या अधिकारामध्ये किती अनुदान दिलेले आहे हे सांगावे. अंध, अपंग संस्थेला अनुदान दिलेले नाही त्यांना वागणुक सुध्दा चांगली दिलेली नाही हा विषय गांभीर्याने घ्यावा. त्यांच्यावर आपण उपकार करत नाहीत. त्यांना सन्मानाने,सहानुभूतीपुर्वक येथे बोलावून त्यांचे कागदपत्र काय असतील त्यांच्या अटि शिथिल करुन द्यायला पाहिजे. आतापर्यंत अशा किती संस्थांना अनुदान दिले आहे याचा खुलासा करावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, अंध,अपंग शाळे संदर्भात महापालिकेनी ठराव केलेला आहे. महापौरांनी सुध्दा सांगीतले आहे की मंडळाना अनुदान न देता अंध,अपंग संस्थेला दयावे असे असताना सुध्दा अंध,अपंग शाळांनी फाईली सबमिट केल्या, दहा-बारा वेळा चकरा मारल्या त्यांना रिजेक्ट केलेले आहे. काही ना काही तरी कारण नमुद करुन त्यांच्या फाईली वापस लावतात. त्यांना अनुदान देण्यात यावे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, प्रविण नेवाळे यांचा सन्मान म्हणून आपण ती रक्कम देण्याचे ठरविलेले आहे. १० लाख शिल्लक आहेत असे समजलेले आहे. श्री.हनुमान मंदीर सेवा ट्रस्टचा हा विषय आहे. मा.आमदार आण्णा बनसोडे यांनी तो विषय स्थायी समितीमधुन दिलेला आहे. विषय करायचा नसेलतर तीन लाखाच्या पुढे विषय जातो. अंध शाळेनी अर्ज दिलेले होते. मागच्यावेळेस सुध्दा ३० लाखाच्या अनुदानातून अंध,अपंग,मुकबधिर यांना

दयावे,नगरसेवकांच्या संस्थाना देवू नये असा ठराव केलेला आहे. १० लाख शिल्लक असतीलतर शहरातील अशा ज्या संस्था आहेत त्यांना समान डिव्हाईड करुन १० लाख दिले पाहिजेत माझ्या वॉर्ड मध्ये अपंगाची शाळा आहे,पांजरपोळला अंध शाळा आहे. अशा ज्या संस्था शहरामध्ये काम करतात त्यांना समप्रमाणात रक्कम द्यायला पाहिजे. प्रविण नेवाळे यांना तीन लाख दिल्यानंतर सात लाख राहतात ते समप्रमाणात सर्व संस्थाना दयावेत.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, फेब्रूवारी २००७ ला महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर पहिल्याच वर्षी हे जे नगरसेवकांच्या मंडळाना अनुदान वाटप होतहोते ३० लाखाचे त्याला अनेक सदस्यांनी आक्षेप घेतला अंध,अपंग, मतिमंद अशा संस्थाना द्यावे असा निर्णय झाला. जेव्हापासून आपण मंडळाना अनुदान द्यायचे बंद केले तेव्हापासून आतापर्यंत कोणत्या कोणत्या अंध,अपंग,मतिमंद संस्थाना किती रक्कम दिली याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

मा.महापौर :- सन्मा.सदस्यांना सांगतो हा विषय सदस्यांचा आहे त्यामुळे याचे डॉकेट नाही. जेवढे काही पैसे गेलेले आहेत ते आपल्या सर्वांच्या मंजूरीमुळे गेलेले आहेत त्याशिवाय पैसे जात नाहीत. आपण सुध्दा हिशोब ठेवला पाहिजे. आता ८ लाख शिल्लक आहेत. हा सदस्यप्रस्ताव आहे.

मा.कारचे :- मा.महापौर साहेब, अनुदान सदराखाली ३० लाखाचे अनुदान आहे त्यापैकी २० लाख खर्च झालेला आहे व १० लाख शिल्लक आहेत. चॅरीटेबल ट्रस्टसाठी २५ लाखाची तरतूद आहे. कामधेनू संस्था,भोसरी यांना २ लाख ९० हजार, स्वामी विवेकानंद संस्थेला १५ लाख ६७ हजार दिलेले आहेत.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, ३० लाखा व्यतिरीक्त सांगावे. अंध,अपंग संस्थेचा जो ठराव केला त्या ठरावाच्या अनुषंगाने अंमलबजावणी झाली का नाही हे सांगावे.

मा.कारचे :- मा.महापौर साहेब, ती माहिती घेवून सांगतो. हे २००८-०९ या वर्षाचे आहे. शासन मान्यता आणि शासन मान्यतेव्यतिरीक्त आहे, तीन लाखाच्या पुढचे शासन मान्यतेसाठी पाठवितो. तीन लाखाच्या आत मधले सांगतो, कामधेनू,भोसरी २ लाख ९० हजार, साई संस्कार २ लाख ९० हजार, अस्था २ लाख ९० हजार, ब्रम्हदत्त २ लाख ७ हजार, या शिवाय तीन लाखाच्या वरचे आहेत. स्वामी विवेकानंद संस्थेला १५ लाख ६७ हजार, तळेगाव येथील संस्थेला १० लाख....

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, सामाजीक बांधीलकी या नात्याने सांगतो या नंतरच्या काळामध्ये फक्त अर्ज घेवून त्यांना बोलवावे आणि सन्मानाने अंध,अपंग याना समान पध्दतीने रक्कम दयावी व एकाच वेळेस सर्वाना चेक द्यावा,

त्यांची हॅरेसमेंट होते. महापौर साहेब, तुम्ही स्वत: लक्ष घालून हे अनुदान त्यांना दयावे. त्या सर्वांचा कारभार पाहून सर्वाना अनुदान मिळेल अशा पध्दतीने नियोजन करावे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. आता कारचे साहेबांनी २००८ चा खुलासा केलेला आहे. या वर्षाच्या ३० लाखाचे काय केले हे सांगीतले पाहिजे, ते त्यांनी सांगीतलेले नाही. मार्चला अनुदान देणार आहोत, आता फॉर्म मागविलेले आहेत, मार्चचे अनुदान मिळाले पाहिजे. आता किती पैसे शिल्लक आहेत हा खुलासा करावा. ज्या संस्था काम करतात त्यांच्याकडे सर्वानी जावून खरेच त्यांनी काम केलेले आहे का नाही ते बघावे. मागच्या वर्षाच्या अनुदानाचा खुलासा केलेला आहे. १५ फेब्रूवारीला जे अर्ज मागविलेले आहेत त्यात किती पैसे शिल्लक आहेत याचा खुलासा करावा. दिशाभूल होता कामा नये.

मा.महापौर :- आयुक्त साहेब, असे नमुद करावेसे वाटते की हा विषय सन्मा.सदस्यांचा असलातरी त्यांना तो अधिकार आहे. येथून पुढे कोणत्याही मिटिंगला हा विषय सदस्यांचा आहे म्हणून प्रशासनाची तयारी नाही असे ऐकूण घेतले जाणार नाही, तो सन्मा.सदस्यांचा अपमान आहे. विषयपत्रिकेवर जे विषय असतील त्या विषयांची संपुर्ण माहिती संबंधित अधिका-यांनी उपलब्ध ठेवली पाहिजे. संबंधित अधिकारी जागेवर नाहीत असे चालणार नाही तशाप्रकारचे आदेश द्यावेत. १० तारखेच्या आत विषयपत्रिका मिळते अभ्यास करुन सर्व माहिती अधिका-यांनी सभागृहामध्ये ठेवली पाहिजे. सन्मा.सदस्यांचा विषय असल्यामुळे आता त्यांच्याकडे माहिती नाही. कारचे साहेबांनी आता चार्ज घेतलेला आहे. विषयाचे काय करायचे ते सांगावे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, हा विषय केला नाहीतर येणा-या मार्च मध्ये जे आठ लाख राहिलेले आहेत ते सुध्दा अंध,अपंग मुलाना देता येणार नाहीत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, कारचे साहेबांनी ज्या संस्थेचे नाव वाचले त्यांना अनुदान दिले असे सांगीतले आहे. हे कसे दिलेले आहे मीतर सर्व जी.बी.ला येतो, हा ठराव पास झाला असे वाटत नाही. रितसर ठराव आणुन दिले का, का ऐनवेळचा विषय दिलेला आहे हे माहिती पाहिजे. जीबीच्या मिटिंगमध्ये असे ठराव घुसडण्याचे काम बंद करावे. एक उपसूचना वाचलीतर बाकीच्या उपसूचना वाचल्या जात नाहीत. एवढया संस्थाना अनुदान दिलेले आम्हांला माहित नाही. उपसूचना दिली का ठराव दिलेला आहे याची माहिती दयावी. प्रमोशनच्या उपसूचना देतो, अनुदानाच्या उपसूचना देतो मग जीबी कशाला चालवितो. किती उपसूचना घुसडतात हे बंद करा. प्रशासनाला आदेश

द्यावेत कुठल्याही उपसूचना वाचल्या नाहीतर त्या घ्यायला नाही पाहिजे ३०-३० कोटीच्या उपसूचना दिलेल्या आहेत.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, संबंधित विभागाच्या अधिका-यांनी नाव वाचून दाखविलेले आहे. त्यामध्ये त्या संस्थेला किती रक्कम दिली हे सांगीतलेले आहे. मंगलाताई कदम यांनी सांगीतल्याप्रमाणे आता मार्च अखेर ही रक्कम शिल्लक राहिलीतर ही रक्कम मिळणार नाही. अंध,अपंग,मतिमंद या संस्थाना ही अनुदानाची रक्कम गेली पाहिजे. मंडळाना आणि प्रतिष्ठानला अनुदान दिल्यामुळे त्याचा वापर चुकिच्या पध्दतीने होतो म्हणून हा निर्णय घेतलेला आहे. आम्ही अनुपस्थित नाहीत, घुसडविलेले हे विषय आहेत. अशाप्रकारचे विषय परस्पर घुसडविले जातात त्याला मंजूरी दिली जाते. अंध,अपंग,मतिमंद संस्थांना अनुदान देणार आहोत, मोहननगरमध्ये जी अंध,अपंग संस्था आहे त्यांच्याकडून अनुदानाची मागणी केली जाते, त्यांना अनुदान देत नाहीत त्यांना टाळतो. राष्ट्रीय खेळाडू नेवाळे यांना अनुदान देण्याचा विषय आहे. आपल्या ऑफिसमध्ये एक मुलगा येतो त्याला इ. १० वी मध्ये ९६ टक्के मार्क आहेत त्याला आपण मदत करु शकत नाही. आतापर्यंत किती अंध,अपंग,मतिमंद संस्थाना अनुदान दिले याचे स्पष्टीकरण दयावे. किती रक्कम शिल्लक आहे.

मा.अति.आयुक्त :- मा.महापौर साहेब, या विभागाचे अधिकारी नाहीत त्याबद्यल दिलगिरी व्यक्त करतो. मागच्या वर्षी ठराव केला त्याप्रमाणे जाहिरात काढली होती त्यानंतर स्थायी समितीत विषय ठेवून २० लाख गेले का २२ लाख गेले हे आता सांगता येणार नाही. या वर्षी सुध्दा जाहिरात काढलेली आहे त्याची मुदत १५ फेब्रूवारीपर्यंत आहे. आतापर्यंत १२ अर्ज आलेले आहेत.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, वर्तमानपत्रामध्ये जाहिरात कधी दिली.

मा.अति.आयुक्त :- मला माहित नाही.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब,प्रशासनाच्या वतीने खुलासा देत असताना आपण सन्मा.सभागृहासमोर बोलतो याचे भान ठेवावे. माहिती नसेलतर चुक कबुल करावी. भलतेच उत्तर सहन करणार नाही टंगळमंगळ करुन उत्तर देत असालतर ते चालणार नाही. माजी महापौर म्हणल्याप्रमाणे १५ फेब्रूवारीपर्यंत अर्ज केलेल्या अंध,अपंग संस्थांची वर्गवारी करुन महापौर साहेब, आपण निर्णय घ्यावा. यापुढच्या काळामध्ये प्रशासनाचे उत्तर प्रशासनानेच द्यायचे आहे, उत्तर देता येत नसेलतर तसे सांगावे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पुढचे बजेट तयार करत असताना दोन्ही अनुदानाची हेड उडवून टाकावीत. आपण ५०-६० लाख अनुदान देतो आणि

बीचारे नागरीक उन्हामध्ये उभे राहून कर भरतात. यापुढे महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये अशाप्रकारचे हेड येता कामा नये. नगरसचिवानी नियम सांगावा, एखादया सदस्यानी अनुदानासंदर्भात शिफारस केलीतर त्याचे नगरसेवक पद रद्य होते असे आहे. माझी संस्था म्हणलेतरी त्याला घरी पाठविले पाहिजे. करदाते नागरीक जे आहेत ते कराच्या रुपाने पैसे भरतात त्यांचे अगोदर बघावे. ही महापालिकेची आर्थिक परिस्थिती केवळ प्रशासनामुळे आलेली नाहीतर चुकिची माणसे याठिकाणी बसलेली आहेत म्हणून झालेली आहे. चांगले महापौर या शहराला मिळालेले आहेत. भविष्यामध्ये तुमच्याकडून अपेक्षा आहेत. या महापालिकेचे कामकाज होत असताना महापालिकेच्या हिताचे कामकाज होईल असे अपेक्षित आहे. मी गेल्या तीन अंदाजपत्रकामध्ये सांगीतलेले आहे हे अनुदानाचे हेड ठेवू नका. करदात्यांचा विचार केला पाहिजे. संस्थेचा विचार करण्यापेक्षा सर्वसामान्य नागरीकांचा विचार केला पाहिजे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, खरेतर हा सदस्य प्रस्ताव आहे. सदस्य प्रस्ताव असताना आपली दिशाभूल केली जाते. ३० लाख बजेटची रक्कम आहे,१५ फेब्रूवारीपर्यंत अर्जाची मुदत आहे, बजेट लॅप्स होण्याचा प्रश्न येत नाही. याठिकाणी उपसूचना देण्याचा अधिकार काय आहे. तुम्ही अर्ज मागविले आहेत. अंध,अपंगाला देण्यासाठी आपण सक्षम नसुतर ३० लाखाचे अनुदान ठेवू नका. जयंत्या,उत्सव मंडळानी स्वत:च्या पैशानी करावेत. कर वाढवितो आणि याठिकाणी पैसे देतो. तुम्ही अर्ज कशाला मागविता. अर्ज मागवू नका, तुम्ही ३० लाख विड्रॉ करुन टाका.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, माझी कुठलीही संस्था नाही. तुमच्या काळामध्ये अनेक नगरसेवकांच्या संस्था होत्या त्यावेळेला कशा पध्दतीने काम केले,कशा पध्दतीने मंडळानी पैसे घेतले, हे माहित आहे. आम्ही मंडळाचा एक रुपया सुध्दा घेतलेला नाही. आमच्या वॉर्डामध्ये अंध शाळा आहे त्या संस्थेचा माझा संबंध नाही. हे अंध,अपंग,मतिमंद संस्थेसाठी अनुदान ठेवले म्हणून सांगीतले आहे. गेल्या १५ वर्षात जी लूट झाली त्यावेळेला सर्वांनी तोंडावर बोट ठेवले आणि आता बोलतात. अंध,अपंग आणि मतिमंद संस्थेस अनुदान जाणार आहे. आमच्या वॉर्डामध्ये अशाप्रकारची संस्था आहे त्यांनी अर्ज केलेला आहे, मी नगरसेवक आहे म्हणून ते लोक माझ्याकडे येतात. आप्पा ज्येष्ठ सदस्य आहेत, माझी संस्था कोणतीच नाही आमच्या काळात हे बंद झालेले आहे. तुम्ही १५ वर्षे वाटत होता. हे राहिलेले पैसे अंध,अपंग,मतिमंद संस्थांना समान द्यावेत.

मा.महापौर :- मुदतीमध्ये जे अर्ज आलेले आहेत त्यांची छाननी करुन आता आलेली उपसूचना लक्षात घेवून त्यांना समसमान पैसे वाटप करण्यात यावेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८१३ विषय क्रमांक :- ८

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.नितीन ओव्हाळ, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२९० दिनांक १६/१/२०१०

श्री.हनुमान मंदीर सेवा ट्रस्ट हे वारकरी विद्यार्थ्यांचा ऋषीकेष येथील शिक्षणाचा खर्च स्वतः करीत असल्याने त्यांस मनपा तर्फे र.रू.३,५१,०००/- अनुदान हनुमान मंदीर सेवा ट्रस्टच्या नावे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड शहरात अपंग, मुकबधीर, मतिमंद, अंध व उपेक्षितांसाठी कार्यरत असणाऱ्या व मनोभावी सेवावृत्तीने समाजसेवा करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याने खालील संस्थांना अनुदान वितरणाबाबतच्या अटी व शर्ती शिथील करुन अनुदान मंजूर करण्यास १) साई संस्कार संस्था, ब्रम्ह विष्णू महेश कबड्डी संघ, चैतन्य महिला मंडळ व आनंदवन कृष्ठ वसाहत यांना प्रत्येकी र.रु.२,९०,०००/- २) पिंपरी चिंचवड अपंग मित्र मंडळ व हॅन्डीकॅप सोशल ॲन्ड स्पोर्टस् फौंडेशन यांना प्रत्येकी र.रु.२,००,०००/- [सदर संस्थांनी अनुदान प्राप्तीसाठी मनपाकडे अर्ज सादर केले आहेत] याशिवाय अर्ज सादर केलेल्या संस्थांना उर्वरित रक्कमेतून समान अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१४ विषय क्रमांक :- ९

दिनांक :-१५.०२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अग्नि/१/कावि/१५/१० दि.११.१.१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०३६८ दिनांक २०/१/२०१०

महानगरपालिका हद्दीपासून १० कि.मी. परिसरात नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतींना अग्निशामक ना हरकत दाखले देणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे शुल्क आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १०

दिनांक :-१५.०२.२०१०                                        विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.कर/मुख्य/६/कावि/१२१७/१० दि.१५/१/१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०४९५ दिनांक ०२/०२/२०१०

सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असलीतरी सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्याऐवजी सन २००९-२०१० या वर्षाकरिताचे महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्काचे दर हेच सन २०१०-२०११ या वर्षाकरिता कायम ठेवण्याचे निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, प्रशासनाने काय समजून वाढ केलेली आहे. एका साईडने करयोग्यमुल्य वाढवितो दुस-या साईडने कर वाढवितो. रस्ताकर ५ टक्के केला आहे. हवेवर सुध्दा तुम्ही टॅक्स घेणार का, हे चुकिचे आहे. सामन्य कर १८ टक्के,२६ टक्के,३८ टक्के वाढीव म्हणतो हे वाढीव आहे का. ३२ टक्के,३६ टक्के,४५ टक्के अशा तीन स्लॅबमध्ये टॅक्स पडतो. सर्व वस्तूंचे रेट वाढलेले आहेत. या वर्षी अजीबात टॅक्स वाढवू नका.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
सन २००९-२०१० या वर्षाकरिताचे महानगरपालिका करांचे दर यामध्ये प्रपत्र ब प्रमाणे एकुण ८% वाढ करुन सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, माझा या ८ टक्केला विरोध आहे. मी बोलत होतो ते बरोबर आहे. आपण ८ टक्के वाढीव सुचवितो हे बरोबर नाही.४-४ टक्के वाढविता परत करयोग्यमुल्य वाढले की टॅक्स वाढतो. हे पैसे वाढवू नका. असे वाढवायचे असेलतर माझा विरोध नोंदवावा.

मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब, वास्तविक पाहता प्रशासनाचा जो करवाढीचा ठराव होता तो स्थायी समितीमध्ये आलेला होता. स्थायी समितीमध्ये आम्ही चर्चा करताना सर्व पक्षाचे प्रतिनिधी होते. सत्तारुढ पक्षाचे त्याचप्रमाणे इतर पक्षाचे प्रतिनिधी असताना सर्वांनी हा ठराव एकमताने फेटाळलेला होता. गटनेत्यांच्या बैठकीत मी सूचना केलेली होती की या करवाढीतून जे पैसे मिळणार आहेत त्याऐवजी सोनेविक्रेत्यांनी जी जकात बुडवलेली आहे त्याच्या दहापट दंड वसुल केलातर ही करवाढ करावी लागणार नाही. ज्याठिकाणी ईझी पैसा मिळतो त्याठिकाणी प्रयत्न न करता प्रामाणिकपणे करदाते कर भरतात त्यांच्यावर ही करवाढ करणे योग्य नाही. प्रामुख्याने नागरीकांना महागाईच्या काळात ही करवाढ केलीतर आणखी दंड दयावा लागेल. डिझेल,पेट्रोलची करवाढ झाली की आणखी भाववाढ होण्याची शक्यता आहे. जकातनाक्यावर जागेवर दहापट दंड वसुल करतो. दारुविक्रेत्याकडून दहा-दहा वर्षाची जकात वसुल केलीतर ही करवाढ करावी लागणार नाही. आमचा उपसूचनेला विरोध आहे, मुळ प्रस्ताव मंजूर करावा कोणतीही उपसूचना न स्विकारता प्रस्ताव मंजूर करावा.

मा.गणेश भोंडवे :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये ग्रामीण भागातील १८ गावे आलेली आहेत. ९७ पासून या महापालिकेत आम्ही टॅक्स देत असताना ९७ ला ५० पैसे होता २००१ ला ६० पैसे झाला आणि आज १.५० पैसे झालेला आहे. आमच्या ग्रामीण भागात अग्निशामककर,साफसफाई कर,शिक्षणकर असे अनेक कर लावण्यात आले आहेत. पुर्वी आहेत त्याचप्रमाणे हे टॅक्स ठेवण्यात यावेत.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब,संपुर्ण शहरातील नागरीकांच्या जीवनाशी संबंधीत असलेला हा जीव्हाळयाचा प्रश्न आहे आपल्या निदर्शनास एक बाब आणुन देतो की, सन २००९-१० चे प्रपत्र अ मध्ये चार्ट दिलेला आहे. त्यामध्ये आपण सामान्य कर, साफसफाई कर, अग्निशामक कर,मनपा शिक्षण कर अशा पध्दतीचे सहा कर दाखवलेले आहेत. त्यामध्ये सगळयात महत्वाचे प्रत्येक बीलामध्ये प्रशासकीय सेवा शुल्क ५ टक्के लावले जाते. त्याचा या प्रपत्रामध्ये उल्लेख केलेला नाही. आपल्याच वॉर्डामध्ये एका व्यक्तिला सामान्यकर हा २८ टक्के लावलेला आहे. त्यांचे बांधकाम झालेले आहे ते साधारण १९८० स्क्वे.फुट आहे ते १६ टक्केमध्ये बसायला पाहिजे होते त्यांना २८ टक्के दिलेले आहे. प्रशासकीय शुल्क ५ रुपये केल्यानंतर ५० टक्के कर याठिकाणी लावलेला दिसतो. सामान्यकर २८ टक्के दाखविलेला आहे. हा वाढीव का लावलेला आहे हे समजत

नाही. ही एक चुक नाही अशा पध्दतीचा बीलाचा गठ्ठा आणुन दाखविल. परस्पर सामान्यकराच्या परसेन्टेजमध्ये वाढ केलेली आहे. अनेक चुका आहेत म्हणून लोकांना भूर्दंड पडत आहे. अनेक बीले माझ्या जवळ आहेत. करमुल्यांकन मनपाभवन मध्ये चालते. आठ ते दहा वर्षापासून तेच लोक त्याठिकाणी होते हे मी आपल्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. जगदीश शेट्टी यांनी ८ टक्के वाढीच्या संदर्भात उपसूचना मांडलेली आहे. संपुर्ण पिंपरी चिंचवड शहर हे कामगारांचे शहर आहे,श्रमिकांचे शहर आहे. आज इन्डस्ट्रीअलमध्ये परमनन्ट नौक-या संपुष्टात आलेल्या आहेत. ७० टक्के लोक ठेकेदारी पध्दतीने काम करतात. सर्वसामान्य कामगार हा या शहराचा गाभा आहे येथे ८० टक्के श्रमिक राहतात, तुम्ही आम्ही हे भरु शकतो परंतु सर्वसामान्य श्रमिकाला हे परवडणारे नाही. जनतेसमोर जात असताना आम्हांला अनेक प्रश्नाला उत्तरे द्यावी लागतात. २००९-२०१० चा जो दर आहे तो जशाच्यातसा ठेवावा. प्रशासनाकडून आलेला वाढीवकर मंजूर करु नये.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, खरेतर हा ८ टक्केवाढीचा विषय आणला त्याला विरोध आहे. मी आमच्या ग्रामीण भागाच्या वतीने बोलतो. १९९७-९८ मध्ये २० टक्के दर आम्हांला वाढविला होता त्यानंतर ९९ सालात ४० टक्के आणि २००० सालात ६० टक्के आणि पुढे ८० टक्के एवढी वाढ झालेली आहे. आमची जी टॅक्स आकारणी केली ती सांगतो. ९८-९९ ला १ ते १२००० ला सामान्य कर ५.५ टक्के होता त्यानंतर २००० पर्यंत ८ टक्के केला २००१ मध्ये ११ टक्के केला आणि २०१० यासालामध्ये ११,२१ आणि २८ अशी करआकारणी केलेली आहे. असे असताना आणखी ८ टक्के कर वाढवलातर आमच्यावर अन्याय होणार आहे. हा इन्डस्ट्रीअल ऐरिया आहे, कामगार नगरी आहे. या कामगारनगरी मध्ये महागाईचा डोंगर आहे, आज साखर ३६ रुपये किलो आहे, डाळ ५० ते ६० रुपये किलो आहे आणि हा कराचा डोंगर आहे कामगाराना पगार आहे तो ३ हजारापासून २० हजारापर्यंत. शेतक-यांचा व्यावसाय शेतीवर आहे. सर्वसामान्य नागरीकांना परवडणार नाही असे कर आपण लादतो. पक्षाचा आदेश आहे अशी माहिती मिळाली. आदेश असेलतर ठिक आहे, ज्यांनी आदेश दिला असेल त्यांना सांगतो आमच्याकडे पुर्वी असा टॅक्स वाढलेला आहे आणि १३ वर्षे आम्ही टॅक्स कमी करा म्हणून भांडलो आहोत. आमच्यावर टांगती तलवार ठेवलेली आहे आमचा निर्णय आजपर्यंत झालेला नाही. शासनाकडे तो निर्णय प्रलंबीत आहे. तो निर्णय झाला नाही तरी हा निर्णय आमच्यावर लादणार का हा प्रश्न आहे. आमचा टॅक्स किती घ्यायचा हा निर्णय झाला नसेलतर हे कशा पध्दतीने करायचे. ६० टक्के टॅक्स आमच्यावर मारला गेलेला आहे. तुम्हाला वाढवायचा असेलतर शहरात वाढवावा,ग्रामीण भागात वाढवू नका. ग्रामीण भागामध्ये टॅक्स वाढवू नये,आमचा विरोध राहिल.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, उपसूचना दिली आहे. करामध्ये वाढ ८ टक्के सुचविलेली आहे. मुळामध्ये या करवाढीला माझा व माझ्या पक्षाचा विरोध आहे. करवाढ करण्याची आवश्यकता महापालिकेला भासली नसती, जर नियोजनबध्द कारभार झाला असतातर. अनेक वाढीव कामामध्ये चार वर्षात ५५० कोटी घालविलेले आहेत. आतापर्यंतची ग्रामीण भागातील कराची थकबाकी ५० कोटीची आहे. जकातीमध्ये ८० कोटीच्या कोर्ट केसेस पडून आहेत.झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये प्रचलीत दर शासनाचा होता ९४०/- आपण काम दिले आहे ते १२५०/- ने. त्यामध्ये महापालिकेचे २२५ कोटी जादा गेलेले आहेत. एकिकडे करवाढीच्या बाबत बोलतो परंतू काटकसरीच्या बाबतीत बोलत नाहीत. ऑफिस सजवायला सुशोभीकरणामध्ये साडेसात कोटी खर्च झालेला आहे. ही करवाढ करुन काय करणार आहेत. योजना राबवितो, क्रिडा स्पर्धा घेतो यावर दरवर्षी आडीच कोटी खर्च करतो. या करामध्ये वाढ करुन काय मिळणार आहे. या करवाढीमुळे २४ कोटी मिळणार आहेत. या करवाढीची झळ सन २००४ नंतर ज्यांनी घर बांधले आहेत त्यांना बसणार आहे. आजपासून कोणाला नवीन घर घ्यायचे असेलतर त्याला ८ टक्के वाढ होणार नाहीतर त्याची वाढ ३० ते ३४ टक्क्यावर जाणार आहे. या शहरात दुस-या कोणी घर घेवू नये असे आपल्याला वाटते का. समान कर पध्दत लागू झालीतर सर्वांना समान करपध्दत होईल म्हणून या करवाढीला विरोध आहे. ही महापालिकेची सभा बेकायदेशिर चाललेली आहे कारण कोरम याठिकाणी नाही. कुठलाही विषय मंजूर करत असताना कोरम पाहिजे, आपण बेकायदेशिर सभा चालवतो असे मला वाटते.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, शहराचा महत्वाचा विषय आहे जो प्रत्येक नगरसेवकांच्या संबंधीत विषय आहे, त्याचे गांभीर्य किती आहे हे लक्षात आलेले असेल. कारण सदस्य याठिकाणी थांबलेले नाहीत. याठिकाणी खेद वाटतो की ज्या स्थायी समितीने हा विषय जोरदार चर्चा करुन फेटाळून लावला त्याच स्थायी समितीचे एका सदस्यांनी ८ टक्के दरवाढ सुचविलेली आहे. प्रथमत: आर.एस.कुमार, गणेश भोंडवे, दत्ता साने यांचे मनापासून अभिनंदन करेल. याठिकाणी पक्षनेत्यांनी ८ टक्के दरवाढ सुचविलेली असताना आपण विरोध केलेला आहे. मतदान झालेतर आपण आमच्या बरोबर रहावे. स्थायी समितीत विषय फेटाळला तेही सदस्य आमच्या बरोबर राहतील. महापौर साहेब, या विषयाकडे संपुर्ण शहराचे लक्ष आहे. पुणे मनपाचे आपल्याला उदाहरण दिलेले आहे. त्यांच्याकडे खुप कमी टॅक्स घेतात व टॅक्समध्ये जास्त सवलत देतात. जे लोक मुदतीमध्ये टॅक्स भरतात त्यांना १० टक्के सुट ते देतात व तुम्ही १५ लोकांनाच फायदा देता. मुदतीत कर भरणा-या इतर नागरीकांनी चुक केली का. १५ लोकांनाच तुम्ही सिंगापूरला पाठविणार आहात, बाकीच्या लोकांनी काय केले. जलकर ४ टक्के ठेवला आहे पुणे मनपाला २ टक्के आहे. आपण ऋण काढून सण करतो. कर्ज काढतो, मोठमोठे प्रोजेक्ट करतो हे करत असताना आपण ज्या उधळपट्ट्या करतो त्याच्याकडे आपले लक्ष आहे का. मागच्या वर्षी

सांगीतल्याप्रमाणे अनुदानाची खैरात थांबलेली आहे पण कुस्त्या, जयंत्या, उत्सवाला पैसे देतो. जकातीमध्ये छोटासा टेम्पो क्रॉस झालातर आपण दंड आकारतो, ज्या लोकांनी सोन्याची जकात चुकविली,दारुची जकात चुकविली त्यांच्याकडून दंड का घेत नाहीत. बजाज कडून २३ ते २४ कोटी वसूल केले होते ते नंतर कोर्टात गेलेले आहेत दरवर्षी बुक तपासावे असे आदेश आणलेले आहेत. नागरीक काहीही करु शकत नाहीत.सगळे आपल्या हातामध्ये आहे. प्रत्येक वॉर्डामधुन निवडून आलेले नगरसेवक याठिकाणी आहेत. आपण मध्यंतरी २५ कोटीचा शिर्केंचा विषय केलेला आहे. विदाऊट टेंडर विषय केलेला आहे. जी प्लस फोरचा अनुभव त्यांना नसताना जी प्लस फोरचे काम त्यांना दिलेले आहे. त्यावेळेसचा दर ३२ टक्के जादा होता. ई-टेंडरींगमध्ये ३० ते ४० टक्के बीलो जाते म्हणजे महापालिकेचे ६० टक्के नुकसान केलेले आहे. JNNURM चे पैसे भेटतील म्हणून आपण हे केलेले आहे. आजचा स्क्वे.फुटाचा रेट बघितलातर १३०० ते १४०० रु.स्क्वे.फुट मिळणार आहे हे नुकसान नाही का याकडे दुर्लक्ष कसेकाय करु शकता. ई-टेंडरींग असताना तुम्ही ते ई-टेंडर का कॉल केलेले नाही. १५ लोक होते त्यापैकी ९ क्वॉलीफाय केले, बाकीचे लोक काम करणार का नाही हे का विचारलेले नाही. तुम्ही त्यांच्याकडून पत्र घेतले आम्ही काम करु शकत नाहीत म्हणून. EWS चे काय झालेले आहे त्या लोकांना तुम्ही बोलवलेले नाही. मराठी पिक्चरसाठी करमाफी होती, ती यावर्षी २०० रुपये केलेली आहे आहे तशीच माफी ठेवावी. कोणत्याही प्रकारची करवाढ करु नये याच्याशी मी सहमत आहे. कोणत्याही प्रकारच्या करवाढीला माझा विरोध आहे. कोरम विचारलेला आहे, हे नियमाने चाललेले आहे का.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विषय महत्वाचा आहे. या विषयावर दोन दिवस सर्वसाधारण सभा चालायला पाहिजे. महापालिका आयुक्तांचा हा विषय आहे. तो स्थायी समिती समोर आला आणि आमचे पक्षनेते, स्थायी समिती अध्यक्ष या सगळयांनी मागच्या वर्षाचे जे दर आहेत ते आहे तशाप्रकारे ठेवावेत असा निर्णय घेतला. त्यावेळेला स्थायी समितीचे अभिनंदन करावे तेवढे कमी आहे असे वाटले. करवाढीला माझा विरोध आहे परंतू सभागृहामध्ये कोरम आहे का हे सांगावे.

मा.महापौर :- सन्मा.सभागृहाला विनंती करतो की चर्चेसाठी हा एकच दिवस आहे. आप्पा तुम्ही म्हणालात चर्चा करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून मी सांगतो. २० तारखेला डायरेक्ट विषय मंजूर होईल, चर्चेसाठी आजचाच दिवस आहे परत या विषयावर चर्चा करता येणार नाही.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, ८ टक्के करवाढीला विरोध आहे. सभागृहामध्ये कोरम नसल्यामुळे मिटिंग उदया ठेवावी.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी कोरम नाही अशी मागणी मांडलेली आहे ही चर्चा अधिकृत आहे का नाही.

मा.महापौर :- आप्पा बारणे यांनी चर्चा केलेली आहे मागणी केलेली नाही. आता मारुती भापकर यांनी सांगीतले आहे. आता चर्चा करता येणार नाही, टॅक्सचा निर्णय २० तारखेच्या आत घ्यावा लागेल. सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने शनिवार दि.२०.२.२०१० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक - ४३

सभावृत्तांत

(दि.१५.०२.२०१० दु.२.०० व ३.१५ ची तहकूब सभा)

दिनांक :- २०.०२.२०१०    वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१५.०२.२०१० (दु.३.१५) ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दिनांक २०.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन    महापौर
२. मा.आसवानी डब्बु    उपमहापौर
३. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.थोरात एकनाथ दादा
६. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
७. मा.आल्हाट शांता महेंद्र
८. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
९. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
११. मा.फुगे सुनंदाताई विजय
१२. मा.आशा अंकुश लांडगे
१३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

१४. मा.सावळे सिमा

१५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

१६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

१७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

१८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

१९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२०. मा.यशवंत भोसले

२१. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२२. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

२३. मा.काळूराम मारुती पवार

२४. मा. चांदगुडे महेश गंगाराम

२५. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

२६. मा.भापकर मारुती साहेबराव

२७. मा.शेट्टी जगदिश

२८. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

२९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

३१. मा.उबाळे वैशाली संजय

३२. मा.सुमनताई मधुकर पवळे

३३. मा.उल्हास शेट्टी

३४. मा.कुटे गोपाळ नाना

३५. मा.भोंडवे तुकाराम महादू

३६. मा.खानोलकर मनोज विक्रम

३७. मा.गणेश तुकाराम भोंडवे

३८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

३९. मा.वाघ रघुनाथ दलपत

४०. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

४१. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

४२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

४३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.गावडे जयश्री वसंत

४६. मा.साबळे जगन्नाथ दगडू

४७. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

४८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

४९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

५०. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

५१. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

५२. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

५३. मा.भारती ज्योती सुखलाल

५४. मा.कोकणे संतोष अंकुश

५५. मा.सुतार विजया विजय

५६. मा.दरेकर सतीश दगडू

५७. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

५८. मा.बारणे संतोष नागु

५९. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

६०. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

६१. मा.खोमणे लता हनुमंत

६२. मा.प्रशांत शितोळे

६३. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

६४. मा.अशोकभाई सोनवणे

६५. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

६६. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

६७. मा.जगताप शंकर पांडुरंग

६८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

६९. मा.एकनाथ मोटे

७०. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

७१. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

७२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७३. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

७४. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

७५. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

७६. मा. विनायक सुरेश रणसुभे

याशिवाय मा.आशीष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.मुंढे, मा.गायकवाड,मा.पवार, मा.फडणीस-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी,मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मराठी रंगभूमीवरील जुन्या पिढीतील ज्येष्ठ गायक नट-उदयराज गोडबोले, प्रसिध्द चित्रपट अभिनेते-निर्मल पांडे, फुगेवाडी येथील ज्येष्ठ नागरीक- मारुती भागुजी टोपे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकूब करावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, श्रध्दांजली निमित्त तहकूबी मांडणेत आलेली आहे. १५ तारखेला कोरम अभावी सभा तहकूब झाली त्यावेळेला सांगीतले होते २० तारखेला टॅक्सची निश्‍चिती झाली नाहीतर तेथून पुढे करता येणार नाही. आजची सभा तहकूब झाल्यानंतर जी सभा घेऊ त्यात दरवाढ करता येईल का याचा खुलासा दयावा.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, १५ तारखेला सभा गणसंख्येअभावी तहकूब करताना आपण सांगीतलेले होते, त्यावर कुठल्याही प्रकारची चर्चा करता येणार नाही. प्रशासनाच्या वतीने सांगण्यात यावे आपण कुठल्या नियमाप्रमाणे सभेमध्ये चर्चा करु शकणार नाही, तशाप्रकारचा कुठला कायदा आहे, त्यासंदर्भात नगरसचिव यांना स्पष्टीकरण देण्यास सांगावे त्यानंतर पुढच्या सभेच्या संदर्भात निर्णय घ्यावा.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, १५ तारखेला सभा तहकूब केली होती त्यावेळेला पुणे शहरात एवढा मोठा बॉम्बस्फोट झाला त्यामध्ये दहा माणसे मरण पावली होती व ६० माणसे जखमी अवस्थेत होती त्यांच्यासाठी व महापालिकेमध्ये ४० वर्षे सेवा केली ते माऊली लांडगे यांच्यासाठी सभा एक तास तहकूब केलेली होती. आज पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना भेडसावणारा प्रश्‍न करवाढीचा आहे त्यामुळे आपण सभा तहकूब करु नये. आज सभा तहकूब केलीतर तुम्ही करवाढ रद्य करणार का याचा खुलासा करावा.

(मा.नगरसचिव यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियम यामधील नियम क्र. १९ व मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ९९ चे वाचन केले)

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

मा.महापौर :- विषय क्रमांक १० वर चर्चा चालू होती त्याचवेळेला गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागली. त्यावेळेला उपसूचना देण्यात आलेली होती.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

(गोंधळ )

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८१५ विषय क्रमांक :- १०

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.कर/मुख्य/६/कावि/१२१७/१० दि.१५/१/१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०४९५ दिनांक

सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असलीतरी सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्याऐवजी सन २००९-२०१० या वर्षाकरिताचे महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्काचे दर हेच सन २०१०-२०११ या वर्षाकरिता कायम ठेवण्याचे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी अशी शिफारस करणेत आली आहे. तथापि सन २००९-२०१० या वर्षाकरिताचे महानगरपालिका करांचे दर यामध्ये प्रपत्र ब प्रमाणे एकुण ८% वाढ करुन सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -३४ प्रतिकूल- २७

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

(गोंधळ)

मा.महापौर :- सभेमध्ये जे गैरशिस्त वर्तन करतात त्यांना बाहेर काढावे लागेल. मारुती भापकर आपण गैरशिस्त वर्तन करता आहात आपल्याला बाहेर काढावे लागेल.

(गोंधळ)

मा.महापौर :- सभागृहाची शिस्त पाळावी. सर्वानी कृपया जागेवर बसावे अन्यथा सभागृहा बाहेर काढावे लागेल.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१६ विषय क्रमांक :- ११

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/८/कावि/३१३/२०१० दि.२०/१/१०
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०५१२ दिनांक ०२/०२/२०१०

सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगधंदा परवाना फी चे दरपत्रक प्रपत्र अ, व्यवसाय परवाना फी चे दरपत्रक प्रपत्र ब व साठा परवाना फीचे दरपत्रक क मध्ये प्रस्तावासोबत सादर केलेले असुन प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र ड मध्ये नमुद

केलेप्रमाणे उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फीचे दर सध्या अस्तित्वात असलेल्या फीवर १०० % वाढीव प्रस्तावीत करून आकारणेस सुचविणेत आले असल्याने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता उद्योगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी मध्ये सुचविणेत आलेप्रमाणे दरवाढीस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी त्याऐवजी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिताचे उद्योगधंदा,व्यवसाय,साठा परवाना फीचे प्रचलित दरात १० % वाढ सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(गोंधळ)

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, सभागृहामध्ये लेडीज सुरक्षारक्षक बोलावले पाहिजेत.

(गोंधळ)

मा.महापौर :- विषय क्रमांक ११ मंजूर झालेला आहे, कृपया सर्वानी खाली बसावे.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, सुरदास गायकवाड हे माझ्या लहान भावासारखे आहेत, त्यांचे माझे संबंध २० वर्षापासून आहेत. चुकून त्यांचा अपमान झाला असेलतर मी माफी मागते. सभागृहामध्ये महिला सुरक्षा रक्षक नसतात. याठिकाणी सुरक्षारक्षक आमच्या अंगाशी झटत होते. अरेतूरेची भाषा बहिण-भावामध्ये चालते. सुरदास गायकवाड हे माझ्या भावासारखे आहेत. येथून पुढे सभागृहामध्ये महिला सुरक्षारक्षक पाहिजेत.

मा.महापौर :- यापुढे महिला सुरक्षारक्षक याठिकाणी असायला पाहिजेत. परंतू आपण अशी वेळ कशाला आणता. मारुती भापकर लोकशाही पध्दतीने तुम्ही निषेध केला,तुम्ही वर पर्यंत आला ठिक आहे परंतु मानदंड ओढणे हे तुम्हांला शोभते का. लोकशाही पध्दतीने मतदान घेतले व मतदान झाले. लोकशाही पध्दत अवलंबील्यानंतर तुम्ही त्याचे स्वागत केले पाहिजे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो-

ठराव क्रमांक :- ८१७ विषय क्रमांक :- १२

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/३/कावि/२४६/१० दि.२१/१/१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०५१५ दिनांक ०२/०२/२०१०

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता अ, ब आणि क नुसार परिशिष्ठ अ मधील जाहिरात कराचे व परिशिष्ठ ब मधील परवाना फी / शुल्क यामध्ये (विलंब शुल्क वगळता) तसेच परिशिष्ठ क मधील जागा भाडे दर नमुद केलेले असुन सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता परिशिष्ठ ब मधील विलंब शुल्काची (अ.क्र.१५) आकारणी करताना १.१० % ऐवजी २ % प्रमाणे करणेकामी तसेच प्रोसेसिंग फी म्हणून नविन आकाशचिन्ह परवान्याकरिता र.रू.५००/- व नुतनीकरण परवान्याकरीता र.रू.२५०/- नव्याने आकारणी करणेकामी सुचविणेत आले असल्याने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षा करीता आकाशचिन्ह जाहीरात कर, परवाना फी/शुल्क व जागा भाडे प्रस्तावा सोबतचे परिशिष्ठ अ, ब आणि क प्रस्तावित दरपत्रका प्रमाणे वसुली करणेस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी त्या दरपत्रकामधे “ सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिताच्या जाहिरात कराचे दरात १० % वाढ सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता करण्याचा, जाहिरात फलकाच्या जागा भाडयात कुठल्याही प्रकारची वाढ न करण्याचा, प्रोसेसिंग फी म्हणून नवीन आकाशचिन्ह परवान्याकरिता र.रु. १०००/- व नुतनीकरण परवान्याकरिता र.रु. १००/- आकारण्याचा,” फेरफार करुन त्यानुसारच्या सुधारित दरपत्रकाप्रमाणे वसुली करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.तानाजी खाडे :- विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८१८ विषय क्रमांक :- १३

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आ/२/कावि/४५/२०१० दि.२५/१/२०१०

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०५१९ दिनांक ०२/०२/२०१०

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान २००८-०९ अंतर्गत प्रत्येक प्रभागात १) अ प्रभाग १.वॉर्ड क्र.४- कृष्णानगर-प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.५३- आकुर्डी गावठाण - व्दितीय क्रमांक २) ब प्रभाग १.वॉर्ड क्र.६६- दर्शन हॉल - प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.२९ -अजमेरा कॉलनी- व्दितीय क्रमांक ३) क प्रभाग १.वॉर्ड क्र.३०- नेहरूनगर- प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.२२- लांडेवाडी-व्दितीय क्रमांक ४) ड प्रभाग १.वॉर्ड क्र.९७- पिंपळेगुरव गावठाण-प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.७२-अशोक थिएटर-व्दितीय क्रमांक याप्रमाणे प्रथम व व्दितीय क्रमांकाचे वॉर्ड निश्चित झाले असल्याने १.प्रथम क्रमांकाच्या वॉर्डास प्रत्येकी र.रू.१,००,०००/- फक्त २.व्दितीय क्रमांकाच्या वॉर्डास प्रत्येकी र.रू.५०,०००/- फक्त या प्रमाणे बक्षिसे जाहीर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियाना अंतर्गत प्रत्येक प्रभागामध्ये बक्षीस जाहिर केलेले आहेत. ते कशाच्या आधारे जाहिर केलेले आहेत. कारण अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाच्या संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानां अंतर्गत महापालिकेनी या शहरामध्ये स्वच्छता आहे म्हणून कागदपत्र सादर करुन बक्षीस मिळविलेले होते. ते वॉर्ड ज्या सन्मा.नगरसेवकांच्या हद्दीमध्ये येतात त्यांचे नाव सांगावे. या शहराचा स्वच्छतेचा प्रश्न आपल्याला वाटतो तीतका चांगल्याप्रकारे नाही. स्वच्छतेचे काम म्हणावे तसे होत नाही. ब-याचशा वॉर्ड मधील कचरा उचलला जात नाही, औषध फवारणी केली जात नाही, कोटयावधी रुपये खर्च करतो. एवढे करुन सुध्दा स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. काही वॉर्डामध्ये कचरा उचलण्यासाठी गाडया नेमलेल्या आहेत. त्या एकदिवसा आड, दोन दिवसा आड येतात. मी आरोग्य अधिकारी यांना फोन करुन सांगीतले मला उत्तर मिळाले की आपण एक दिवसा आड कचरा उचलतो. अशा पध्दतीने महापालिकेच्या आरोग्य विभागाचा कारभार चालू असताना आपण बक्षीस जाहिर केलेले आहे. एकिकडे महापालिका आर्थिक संकटात आहे. कर्ज घेण्याचे फार मोठे धाडस केलेले आहे आणि दुसरीकडे वॉर्डातील बक्षीस जे जाहिर केलेले आहे ते कशाच्या आधारे जाहिर केलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ज्या वॉर्डामध्ये बक्षीस जाहिर केलेले आहे ते वॉर्ड

सन्मा.नगरसेवकांचे किंवा पदाधिका- यांचे आहेत. आकुर्डी गावठाण हा वॉर्ड ज्ञानेश्वर भालेराव यांचा आहे. कृष्णानगर वॉर्ड मंगलाताईंचा आहे. दर्शन हॉल हा वॉर्ड अपर्णा डोके यांचा आहे, पिंपळेगुरवचा वॉर्ड, लांडेवाडीचा वॉर्ड आमदारांचा आहे, नगरसेवक पाहून बक्षीस जाहिर केलेले आहेत का. या प्रक्रियेला माझा विरोध आहे, आज सुध्दा कचरा वेळेवर उचलला जात नाही. आपल्याकडे आता ओपन गटर राहिलेले नाहीत बंद गटर आहेत. कर्मचारी जास्त असताना सुध्दा ठेकेदारी पध्दतीने कचरा उचलण्यासाठी दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ८० कोटी वर्षाकाठी आरोग्यावर खर्च करतो. तो खर्च नागरीकांपर्यंत पोहचतो का. नागरीकांची आज सुध्दा तक्रार आहे की वेळेवर कचरा उचलला जात नाही, साफसफाई, औषध फवारणी वेळेवर होत नाही. या शहरातील मलेरीया,डेंग्यू, स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण वाढत चाललेले आहेत. म्हणून या योजनेच्या बाबतीत, ज्यानी ही योजना प्रशासनाच्या माध्यमातून जाहिर केली त्यांनी खुलासा करावा. कोणाच्या वॉर्डामध्ये हे बक्षीस जाहिर केले त्या सन्मा.नगरसेवकांचे नाव समजू द्यावे तसेच निष्कर्ष कळू द्यावा. त्या भागातील नागरीकांनी कच-याच्या बाबतीत तक्रार केलेली नाही का हे सुध्दा सांगीतले पाहिजे. निकष काय लावले हे सांगावे. त्या परिसरातील नागरीकांच्या तक्रारी आरोग्याच्या बाबतीत गेल्या चार महिन्यात असतीलतर, असे महापालिकेचे पैसे उधळणे किंवा यातून काय साध्य होणार हे सांगावे माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

मा.अशोक सोनवणे :- मा.महपौर साहेब, सांगवी विभागात कच-याच्या पाच रिक्षा आहेत. त्या नियमित चालू असतीलतर कचरा व्यवस्थीत उचलला जातो एखादी गाडी बंद पडलीतर आम्ही समजू शकतो एक गाडी बंद असताना एक दिवस नागरीक,नगरसेवक सहन करु शकतात. दुस-या दिवशीतरी ती गाडी त्या गल्लीमध्ये गेली पाहिजे. फोन केल्यानंतर गाडया नादुरुस्त आहेत असे कायमच सांगतात. कमी गाडया असताना सुध्दा नियोजन केलेतर होऊ शकते. तरी अधिका-यांना सूचना द्याव्यात की व्यवस्थीत नियोजन करुन हे करावे. मागच्या वर्षी बक्षीस जाहिर केले ते दिले गेले का याचा सुध्दा खुलासा करावा.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान २००८-०९ अंतर्गत ज्या प्रभागामध्ये चांगल्या पध्दतीची स्वच्छता झालेली आहे त्यांच्यासाठी आपण बक्षीस जाहिर केलेले आहे. मला प्रश्न पडलेला आहे, प्रशासन स्वत: चार वॉर्डाना बक्षीस जाहिर करते याचा अर्थ १०१ वॉर्ड घाणीच्या साम्राज्यामध्ये आहेत का. सफाई आमचे कर्मचारीच करतात,ठेकेदार आम्हीच दिलेले आहेत. प्रशासन एका बाजुला हे बक्षीस देवून आपली पाठ थोपटून घेते का. १०१ वॉर्डमध्ये स्वच्छता झालेली नाही. माझ्या वॉर्डमध्ये सांगायचे झालेतर वारंवार कच-याचा ढिग निरीक्षकाला दाखवावा लागतो. ते सांगतात सोसायटीची सार्वजनिक जागा आहे, महापालिकेची जागा आहे, कच-याचा ढिग गोळा करुन त्या मोकळया जागेमध्ये ठेवला जातो तो पहाटेच्या वा-यामध्ये विखुरला जातो

त्याचा परिणाम नागरीकांना भोगावा लागतो आणि आपण बक्षिस जाहिर केलेले आहे. एका निरीक्षकाला पाच-पाच वॉर्ड दिलेले आहेत काही ठिकाणी ठेकेदाराचे कर्मचारी आहेत काही ठिकाणी आमचे कर्मचारी आहेत. आपल्या काही कर्मचा-यांनी आपल्या डयुटीच्या जागेवर बाहेरचे कर्मचारी लावले आहेत आणि स्वत: इतरत्र जातात आणि आपली स्वच्छता इतर कर्मचा-यांना दिली जाते आणि त्यासाठी त्यांना दोन ते तीन हजार मानधन दिले जाते. निरीक्षकांनी गांभीर्यपुर्वक पाहणे आवश्यक आहे. चारच वॉर्डाची निवड होणे म्हणजे १०१ वॉर्ड स्वच्छ नसणार असे प्रशासनाने दाखवून दिलेले आहे. यासाठी कोणते निकष लावण्यात आलेले आहेत याचा खुलासा करावा.

मा.चव्हाण (आरोग्य अधिकारी ) :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र शासनाने कळविल्याप्रमाणे सन २००३ ला संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान नागरी भागामध्ये सुरु करण्यात आलेले आहे. यामध्ये दरवर्षी महापालिकेनी भाग घ्यावा असे सर्क्युलर आहे. त्यासाठी दरवर्षी २ ऑक्टोबर पासून सुरु होते आणि १४ नोव्हेंबर पर्यंत अभियान संपते. यावर्षी २००८-०९ चे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये आपण सहभागी झालेलो आहोत. शासनाने २००७-०८ पासून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाची रुपरेषा होती त्यात बदल करुन राजपत्रित अधिकारी आणि सचिव लेव्हलची कमिटि आहे. महापालिकेच्या अधिका-यामध्ये वर्ग-१ व २ चे या कमिटिमध्ये सदस्य नेमावेत असे शासनाचे मार्गदर्शन आहे त्याबाबतीत महापालिकेच्या चारही प्रभागामध्ये अ, ब गट आहे त्यात अ-गटामध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन असे मुद्दे आहेत. प्रत्येक मुद्यासाठी १०० मार्क आहेत. अ-गट व ब-गट असे दोन गट आहेत.

मा.महापौर :- हे पैसे कोण खर्च करते.

मा.चव्हाण :- मा.महापौर साहेब, महापालिकेच्या फंडामधुन ही योजना राबवितो. अ व ब गट आहेत त्यात पाच-पाच मुद्दे आहेत अ गटाला ५०० मार्क आहेत. २ ऑक्टोबरला त्या वॉर्डाची परिस्थिती जशी आहे तशी नमुद करुन १० जून पर्यंत महापालिकेनी काय काय सुधारणा केलेली आहे त्यावरुन मार्क द्यायचे आहेत. प्रभाग अधिकारी त्या कमिटिचे अध्यक्ष आहेत. कार्यकारी अभियंता, सहा.आरोग्य अधिकारी असे कमिटिचे मेंबर आहेत. अ-प्रभाग अधिका-यांनी ब-प्रभागाची, ब-प्रभाग अधिका-यांनी क- प्रभागाची, क-प्रभाग अधिका-यांनी ड-प्रभागाची तपासणी करायची आहे. त्यांच्याकडील रिपोर्ट पाहिलेले आहेत त्यांच्या सहीनिशी हे वॉर्ड निवडलेले आहेत. प्रत्येक प्रभागामध्ये २ बक्षीस द्यायचे आहेत. पहिल्या नंबरला १ लाख दुस-या नंबरला ५० हजार असे चार प्रभागामध्ये मिळून सहा लाखाचे बक्षीस

आहे. शासनाकडे हे रिपोर्ट पाठविल्यानंतर पहिल्या नंबरचे चार लाखाचे बक्षीस शासनाचे आहे. सन २००३ मध्ये सर्वोत्कृष्ट प्रशासकीय बक्षीस ५ लाखाचे अ-प्रभागास मिळालेले आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आता जाहिर केलेल्या वॉर्डाचे नगरसेवक कोण आहेत हे सांगावे.

मा.चव्हाण :- मा.महापौर साहेब, अ-प्रभागामध्ये वॉर्ड क्र.४ कृष्णानगर हा वॉर्ड मा.थोरात साहेबांचा आहे, वॉर्ड क्र. ५३ आकुर्डी गावठाण मा.ज्ञानेश्वर भालेराव यांचा आहे, ब-प्रभागामध्ये वॉर्ड क्र. ६६ दर्शन हॉल हा मा.अपर्णा डोके यांचा आहे, वॉर्ड क्र. २९ -अजमेरा कॉलनी मा.राजेश पिल्ले यांचा आहे, क-प्रभागामध्ये वार्ड क्र. ३० नेहरुनगर हा मा.हनुमंत भोसले यांचा आहे व वॉर्ड क्र. २२ लांडेवाडी हा मा.जितेंद्र ननावरे यांचा आहे, ड-प्रभागामध्ये वॉर्ड क्र. ९७ पिंपळेगुरव गावठाण हा मा.शंकर जगताप यांचा आहे, व वॉर्ड क्र. ७२ अशोक थिएटर हा वॉर्ड मा. अमर मुलचंदानी यांचा आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ज्या प्रभागामध्ये पहिला आणि दुसरा क्रमांक देण्यात आला त्याबद्यल तेथील नगरसेवकांचे अभिनंदन करतो. ज्या भागातील काम अतीशय चांगल्या पध्दतीने झालेले आहे त्या भागातील एस.आय.चा सुध्दा सत्कार करावा. बाकीच्या ठिकाणी का होत नाही, त्या भागातील अधिका-यांवर कार्यवाही करावी. माझ्या भागामध्ये ज्या रिक्षा घेतलेल्या आहेत त्याठिकाणी आरोग्याचे कामगार नाहीत, त्याठिकाणी ब-याचशा अडचणी आहेत अशाठिकाणी सुध्दा लक्ष घातले पाहिजे. आम्ही सुध्दा चांगले काम झाले पाहिजे म्हणून प्रयत्न करत असतो. ज्या ज्या भागामध्ये कर्मचारी नाहीत किंवा कमी आहेत तेथील कर्मचारी वाढवावेत.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, शासनाच्या आदेशाप्रमाणे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान आहे. या शहरातील नागरीक आरोग्याच्या बाबतीत समाधानी नाहीत. केवळ शासनाने २००३ मध्ये सुचना दिली म्हणून ही योजना चालू केली आहे. नगरसेवकांच्या किंवा नागरींकाच्या खीशामध्ये हे जाणार नाही. या शहरात कोटयावधी रुपये आरोग्यावर खर्च करुन सुध्दा कचरा वेळेवर उचलला जात नाही, साफसफाई वेळेवर होत नाही, औषध फवारणी वेळेवर मारली जात नाही. यामध्ये नॉर्म्स दिलेले आहेत. पाणी लिकेजेस झाले नाही पाहिजे, रस्त्यावरील खड्डे बुजविले पाहिजेत. वॉर्डामधील साफसफाईचे काम ज्या संस्थाना दिलेले आहे त्या संस्थेच्या कर्मचा-यांना ते पगार देतात का नाही हे सुध्दा पाहिले पाहिजे. त्या कर्मचा-यांना त्या संस्था पुर्ण पगार देत नाहीत. त्यांना पगार कमी देतात हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे. त्यांच्याकडून आपण कामाची अपेक्षा करतो याला जबाबदार ठेकेदार नाही तर त्याला जबाबदार आपले

अधिकारी सुध्दा आहेत. कारण त्यांना अधिका-यांना हाप्ता द्यावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. ही सिस्टीम बदललीतर महापालिका क्षेत्रामध्ये साफसफाईचे काम चांगल्याप्रकारे होईल. आपण जाणीवपुर्वक योग्य त-हेने लक्ष देणे गरजेचे आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाअंतर्गत घेतलेल्या स्पर्धा, त्यात विजयी झालेले वॉर्ड यांचे अभिनंदन करतो. महापालिकेच्या वतीने सेवाभावी संस्थाना वॉर्ड स्वच्छतेचे काम दिलेले आहे. तुलनात्मकदृष्टया टेंडर काढले गेले,स्पर्धा झाल्या. काही लोकांनी २० ते २२ टक्के कमी दराने टेंडर भरले आणि प्रशासनाच्या लक्षात चुक आली की १० टक्के मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे दिलेले नाही. ठेकेदारांनी कामगार कमी केले ज्याठिकाणी दहा लोक पाहिजेत त्याठिकाणी सात आहेत आणि ज्याठिकाणी सात पाहिजे त्याठिकाणी पाच लोक दिलेले आहेत त्यामुळे वॉर्डाची स्वच्छता करता येत नाही. कामगारांना मिनिमम वेजेस ॲक्टखाली पगार द्यावा लागतो. चुक प्रशासनाच्या लक्षात आली आहे तरी भविष्यामध्ये चुक होऊ नये.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, अ-प्रभागामध्ये गंभीर समस्यासंदर्भात एक बैठक झाली त्यामध्ये हा विषय चर्चीला गेलेला होता. वस्तुस्थिती अशी आहे की अनेक वॉर्डामध्ये ठेकेदारी पध्दतीने स्वच्छतेचे काम आहे आणि जे काम २० ते २२ लोकामध्ये व्हायला पाहिजे ते काम १० ते १२ लोकामध्ये केले जाते. ठेके जे आहेत त्याच्यामध्ये प्रत्यक्षरित्या आपल्या सभागृहातील काही सदस्यांचा सुध्दा हात आहे म्हणून आरोग्य अधिकारी डॉ.नागकुमार यांनी अ-प्रभागात बैठकीमध्ये सांगीतले होते ठेका बंद करणार आहोत. त्याठिकाणी जे कर्मचारी काम करतात त्या कामगारांना किमान वेतन आयोग नियमाप्रमाणे पगार मिळत नाही. प्रत्यक्षात सही साडेतीन हजारावर घेतली जाते आणि प्रत्यक्ष दोन हजार दिले जातात. ती सुध्दा माणसच आहेत त्यांची अशाप्रकारे पिळवणूक संबंधीत ठेकेदार करत असतात. कामगारांची पिळवणूक थांबविण्याकरिता कुठले पाऊल उचलणार आहात का नाहीत हे सांगीतले पाहिजे. स्वच्छतेचे काम करत नाहीत तोपर्यंत वॉर्ड स्वच्छ होणार नाहीत व मलेरिया, डेंग्यू थांबणार नाहीत. अनेक नगरसेवक मंडळीचे सरळसरळ ठेके आहेत. त्याठिकाणी कार्यवाही होऊ शकत नाही त्यातील पदाधिकारी सत्तारुढ पक्षाचे आहेत हे विशेष आहे शहरातील नागरीकांच्या आरोग्याशी खेळण्याचे पाप ही मंडळी करत आहेत या पापा पासून मुक्त व्हायचे असेलतर ठेकेदारी पध्दत बंद करुन त्याठिकाणी मानधनावर लोक ठेवण्यात आले आहेत त्यांना पुरेसा पगार नियमाप्रमाणे दिलातर बरे होईल. कॉम्पॅक्टर खरेदी केलेले आहेत त्यासंदर्भात मी पत्र दिलेले होते ते दुरुस्त होत नाही. दुरुस्तीसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. त्यासंदर्भात काय कार्यवाही केली याचे सुध्दा स्पष्टीकरण दिले पाहिजे. आपण वेगवेगळया प्रकारच्या कुंडया खरेदी करतो. त्या कुंडया काही दिवस दिसत होत्या आता दिसत नाहीत. त्या निकृष्ट दर्जाच्या होत्या त्या

आता कुठे आहेत याचे सुध्दा स्पष्टीकरण करावे. आयुक्तांना पत्र कॉम्पॅक्टर संदर्भात, दुरुस्ती संदर्भात दिलेले आहे त्यासंदर्भात काय केले हे सांगावे. ठेकेदारी पध्दतीने आरोग्याचे काम चाललेले आहे त्याठिकाणी पुरेशे कर्मचारी नाहीत. ठेकेदार त्या कर्मचा-यांचे रक्त शोषण्याचे काम करतात याचे स्पष्टीकरण आयुक्तांनी करावे.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, आता आरोग्य अधिकारी चव्हाण साहेब म्हणाले की महाराष्ट्र शासनाचा जी आर आलेला आहे. १०५ वॉर्डामध्ये आरोग्याच्या स्पर्धा लावल्या आहेत, आपण जे बक्षीस ठेवलेले आहे ते पैसे आपलेच आहेत. या खीशातून काढायचे आणि त्या खीशामध्ये ठेवायचे असे आहे. महाराष्ट्र शासनाचे त्यात काय आहे. याठिकाणी महाराष्ट्र शासनाचे अधिकारी आहेत. तुम्ही आम्हांला कधी विचारले आहे का तुमच्या वॉर्डामध्ये स्पर्धा आहे म्हणून. गल्ली-बोळात स्पर्धा घेतलीतर आपल्याला समजेल. महापालिकेचे अधिकारी फॅार्म भरणार, त्यांचेच अधिकारी येणार व हा हा वॉर्ड चांगला आहे असे करणार. माझ्या वॉर्डामध्ये ज्योतीबा मंगल कार्यालय आहे त्याठिकाणच्या सगळया कुंडया कुजलेल्या आहेत. माझ्या वॉर्डामध्ये ठेकेदारी पध्दतीने कर्मचारी आहेत त्यांना तीन महिने झाले पेमेंट मिळालेले नाही. महापालिकेला बक्षीस मिळालेले आहे परंतु महापालिकेची जनता किती घाणीमध्ये राहते हे यांना माहिती आहे का. डॉ.नागकुमार यांचे दोन वर्षे राहिलेले आहेत ते टेन्शन घेत नाहीत. चव्हाण साहेब आता हुशार होत चालले आहेत त्यांना एवढे जमत नाही. कुत्र्याची गाडी आली की वॉर्डातील कुत्रे गुल होतात. संडासच्या गाडीवाल्यांना कितीही फोन करा गाडी खाली केली का, तर नाही असे म्हणतात. माझ्या वॉर्डात स्वच्छता राबवावी.

मा.महापौर :- सन्मा.नगरसदस्यांच्या भावना लक्षात घेता आपल्याही लक्षात आलेले असेल की, स्वच्छतेबद्यल नगरसेवक समाधानी नाहीत. उणिवा,त्रुटिच्या अनुषंगाने ताबडतोब पाऊले उचलली पाहिजेत. प्रश्न दिड लाख देण्याचा नाही. याच्यामध्ये लोकांचा समज होईल की, चार वॉर्डामध्ये लक्ष द्यायचे आणि बाकिच्या वॉर्डामध्ये लक्ष द्यायचे नाही असे न होता सर्व वॉर्डामध्ये लक्ष दिले पाहिजे. सर्वांच्या तक्रारी आहेत स्वच्छतेबद्यल समाधानी नाहीत या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. रणसूभे आणि भापकर यांनी सांगीतल्याप्रमाणे त्याची दखल घेणे आवश्यक आहे. ठेकेदार नेमलेले आहेत. ते तेवढे कर्मचारी लावतात का त्यावर नियंत्रण असायला पाहिजे. आपण मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे पैसे देतांना ख-या अर्थाने स्पर्धा ठेकेदाराच्या सर्व्हिसरेटवर व्हायला पाहिजे. कामामध्ये ठेकेदार ३० टक्के बिलो कसे काय जातात. दहा माणसे पाहिजे असतीलतर मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे त्या माणसास आडीच हजार द्यायला पाहिजेत असे होत नाही. नॉर्म्स ठरवून सर्व्हिस चार्जेसमध्ये स्पर्धा करावी. असे होत नसेलतर ते ठेकेदार ताबडतोब टर्मिनेट व्हायला पाहिजेत गांभीर्याने लक्ष द्यावे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १४

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.प्रशा/६/कावि/३५/२०१० दि.१९/०१/२०१०

विषय- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री.उत्तम हिरवे- नगरसेवक यांचे पालिका सदस्यपद रद्द करुन त्यांच्या विरुध्द भा.द.वि.कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी २/३ पालिका सदस्यांची शिफारस शासनाकडे पाठविण्याबाबत-

दिनांक २५/११/२००९ रोजी महापालिकेचे अपंग कर्मचारी श्री.काळे- मुकादम आणि श्री.तुपे-सफाई कामगार हे सकाळ पाळीमध्ये भोईरनगर (दळवीनगर) या ठिकाणी कार्यरत असतांना स्वीकृत सदस्य श्री.उत्तम हिरवे यांनी सदर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. श्री.काळे या अपंग कर्मचाऱ्याच्या डोक्यात कॉंक्रीटचा ब्लॉक मारला, त्यामुळे त्यांच्या डोक्यास गंभीर इजा झाली होती. त्याशिवाय या कर्मचाऱ्याच्या स्वयंचलीत दुचाकीचेही श्री.हिरवे यांनी नुकसान केले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८२ नुसार महापालिका कर्मचारी हे लोकसेवक आहेत. लोकसेवकास अपशब्द वापरणे, धमकी देणे, मारहाण करणे हे भा.द.वि.कलम ३५३ नुसार फौजदारी गुन्हा आहे.

श्री.उत्तम हिरवे- नगरसेवक यांच्या उक्त वर्तनाबाबत त्यांचे पालिका सदस्य पद रद्द करण्याची मागणी एकता कर्मचारी संघटना व राष्ट्रीय मानवाधिकार एवं पुनरुध्दार संघटना यांनी केलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने श्री.हिरवे यांचेवर फौजदारी आचारसंहिता कलम ३५३ नुसार कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे.

उक्त बाबी विचारात घेता, महापालिकेच्या अपंग कर्मचाऱ्यास श्री.उत्तम हिरवे या स्वीकृत सदस्यांनी मारहाण करणेची घटना योग्य नसल्याने त्यांचेवर योग्य कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री.हिरवे यांचेवर कारवाई करण्याचे अधिकार एकूण

पालिका सदस्यांपैकी २/३ सदस्यांचे शिफारसीने महाराष्ट्र शासनास आहेत. त्यानुसार श्री.हिरवे यांचे पालिका सदस्यपद रद्द करण्यासाठी व त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत यथोचित निर्णय घेण्यासाठी प्रस्तुतचा विषय मा.महापालिका सभेपुढे सादर करावा.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यंाजकडून आला असल्याने त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला असल्याने महानगरपालिका कायद्यातील कलम १३(१) नुसार कोणत्याही सदस्याला पदावरुन दूर करण्यापुर्वी त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे क्रमप्राप्त असल्यामुळे श्री.उत्तम हिरवे यांना महानगरपालिकेच्यावतीने मा.आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घ्यावा आणि खुलाश्यावरील प्रशासनाच्या अभिप्रायासह स्वतंत्र फेरप्रस्ताव मा.महापालिका सभेकडे सादर करावा.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब,आताची उपसूचना ऐकली असेल त्यावरुन असे दिसून येते की, चुकिच्या पध्दतीने विषय मांडला आहे. त्यांना संधी दिलेली नसताना विषय याठिकाणी आणलेला आहे. हा विषय काहीतरी करुन फेटाळायचा आहे किंवा फाटा फोडायचा आहे म्हणून उपसूचना मांडलेली आहे. विषय आणण्यामध्ये चुक झालेली आहे हे कबूल करावे. हा गंभीर गुन्हा झालेला आहे. कर्मचारी महासंघाने सांगीतल्यानंतर हा विषय आणलेला आहे. अपंग कर्मचा-याला मारहाण होत असेलतर व सभागृहात त्यांच्यावर कठोर कारवाई होत नसेलतर उपसूचनेला विरोध आहे. अशी वृत्ती वाढतच जाईल असे चित्र आहे. तुम्ही ठराव मांडला हीच चुक झालेली आहे. सामान्य माणुस असतातर त्याला शिक्षा झाली असती उपसूचनेला आमचा विरोध आहे. ही उपसुचना बरोबर आहे का नाही याचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

मा.महापौर :- आता सांगीतल्याप्रमाणे रणसुभे आपण मांडलेली उपसूचना वाचावी, सन्मा.सदस्यांनी ऐकूण घ्यावे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला असल्याने महानगरपालिका कायद्यातील कलम १३(१) नुसार कोणत्याही सदस्याला पदावरुन दूर करण्यापुर्वी त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे क्रमप्राप्त असल्यामुळे श्री.उत्तम हिरवे यांना महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घ्यावा आणि खुलाश्यावरील प्रशासनाच्या अभिप्रायासह स्वतंत्र फेरप्रस्ताव मा.महापालिका सभेकडे सादर करावा. अशी उपसूचना मांडलेली आहे.

मा.देशमुख :- मा.महापौर साहेब, महापालिकेस नोटिस देण्याचे अधिकार आहेत. कलम १३ अन्वये अशाप्रकारे काढून टाकण्याच्या अगोदर त्यांना महापालिकेनी संधी द्यायची आहे असे आहे. महापालिका आयुक्तांनी नोटिस दिलेली नाही महापालिकेनी सांगीतलेतर आयुक्त नोटिस देणार आहेत. त्यांना काढून टाकायचे का नाही हे महापालिकेनी ठरवायचे आहे. त्यांना बाजू मांडायला संधी द्यायची हे यामध्ये आहे त्याप्रमाणे आपण निर्णय घ्यायचा आहे.

मा.महापौर :- त्यांना बाजू मांडावयास संधी द्यायची का नाही हे आपण ठरवायचे आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८१९ विषय क्रमांक :- १४

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.प्रशा/६/कावि/३५/२०१० दि.१९/०१/२०१०

विषय- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री.उत्तम हिरवे- नगरसेवक यांचे पालिका सदस्यपद रद्द करुन त्यांच्या विरुध्द भा.द.वि.कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी २/३ पालिका सदस्यांची शिफारस शासनाकडे पाठविण्याबाबत-

दिनांक २५/११/२००९ रोजी महापालिकेचे अपंग कर्मचारी श्री.काळे-मुकादम आणि श्री.तुपे-सफाई कामगार हे सकाळ पाळीमध्ये भोईरनगर (दळवीनगर) या ठिकाणी कार्यरत असतांना स्वीकृत सदस्य श्री.उत्तम हिरवे यांनी सदर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. श्री.काळे या अपंग कर्मचाऱ्याच्या डोक्यात कॉंक्रीटचा ब्लॉक मारला, त्यामुळे त्यांच्या डोक्यास गंभीर इजा झाली होती. त्याशिवाय या कर्मचाऱ्याच्या स्वयंचलीत दुचाकीचेही श्री.हिरवे यांनी नुकसान केले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८२ नुसार महापालिका कर्मचारी हे लोकसेवक आहेत. लोकसेवकास अपशब्द

वापरणे, धमकी देणे, मारहाण करणे हे भा.द.वि.कलम ३५३ नुसार फौजदारी गुन्हा आहे.

श्री.उत्तम हिरवे- नगरसेवक यांच्या उक्त वर्तनाबाबत त्यांचे पालिका सदस्य पद रद्द करण्याची मागणी एकता कर्मचारी संघटना व राष्ट्रीय मानवाधिकार एवं पुनरुध्दार संघटना यांनी केलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने श्री.हिरवे यांचेवर फौजदारी आचारसंहिता कलम ३५३ नुसार कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे.

उक्त बाबी विचारात घेता, महापालिकेच्या अपंग कर्मचाऱ्यास श्री.उत्तम हिरवे या स्वीकृत सदस्यांनी मारहाण करणेची घटना योग्य नसल्याने त्यांचेवर योग्य कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री.हिरवे यांचेवर कारवाई करण्याचे अधिकार एकूण पालिका सदस्यांपैकी २/३ सदस्यांचे शिफारसीने महाराष्ट्र शासनास आहेत. त्यानुसार श्री.हिरवे यांचे पालिका सदस्यपद रद्द करण्यासाठी व त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत यथोचित निर्णय घेण्यासाठी प्रस्तुतचा विषय मा.महापालिका सभेपुढे सादर करावा.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला असल्याने महानगरपालिका कायद्यातील कलम १३(१) नुसार कोणत्याही सदस्याला पदावरुन दूर करण्यापुर्वी त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे क्रमप्राप्त असल्यामुळे श्री.उत्तम हिरवे यांना महानगरपालिकेच्यावतीने मा.आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घ्यावा आणि खुलाश्यावरील प्रशासनाच्या अभिप्रायासह स्वतंत्र फेरप्रस्ताव मा.महापालिका सभेकडे सादर करावा.

अनुकूल :- ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८२० विषय क्रमांक :- १५

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

<u>मा. महिला व बालकल्याण समिती</u>

दि.९/१२/०९ व १८/१२/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा. तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८२१ विषय क्रमांक :-१६
दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती

दि.०२/१२/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८२२ विषय क्रमांक :-१७
दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. क्रिडा समिती

अ) दि.२/१२/०९ व ११/१२/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१६/१२/०९ व ६/१/१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१८

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.मोटे एकनाथ नानासाहेब व मा.काटे राजेंद्र भिकनशेठ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३६५ दि.६/१/२०१०

विषय :- झोन बदलणेबाबत-

फुगेवाडी ते कासारवाडी दरम्यान रेल्वेगेटच्या पश्चिमेस स.नं.४७३ ते स.नं.४९६ व ७०० स.नं.मधील शेती क्षेत्र बदलुन तेथे निवासी झोन करण्यात यावा. महाराष्ट्र नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदल करण्यात यावा. सद्यपरिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना शेती करणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांची मानसिकता पहाता तेथे भविष्यात झोपडपट्टी होऊ शकते. तरी मनपाने निवासी झोन केल्यास नियोजनबध्द विकास होईल. तरी त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.गणेश भोंडवे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
मौजे रावेत येथील स.नं.१२३ पैकी १२४ पै. १२५ पैकी, १२७, १२८, १२९, १३०, १३१ ह्या वाल्हेकरवाडी ते रावेत या ३४.५० मी. रुंद रस्त्याचे उत्तरेला असणाऱ्या जमिनी शेतींना विकास विभागामध्ये / हरित विभागामध्ये आहे. आता या जमिनीच्या तीनही बाजूंनी निवासी / रहिवासी झोन आहे. त्यामुळे ह्या जमीनीचा वापर सुध्दा रहिवासी निवासी प्रयोजनासाठी अनधिकृतपणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ३४.५० मी.रुंद रस्त्याचे पासून उत्तरेकडील वरील स.नं.चे सर्व क्षेत्र निवासी / रहिवासी विभागात समाविष्ट करणेकामी मंजूर विकास योजनेस फेरबदल करणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व कार्यवाही उदा.नागरिकांच्या सुचना व हरकती मागविणे सुनावणी घेणे व प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेकामी मा.महापालिका आयुक्तांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी. गट क्र.१२९७ मधिल जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने अन्य कारणासाठी आरक्षित केली असल्यामुळे मौजे चिखली मधील गट क्र.१२९४, १२९७, १३०३, १३०४, १३०५ व १३०७ मधील गार्डन (आरक्षण क्र.G १/१०८) चे आरक्षण हे या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन

त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी. मोरे वस्ती या भागातील प्राथमिक शाळा आरक्षण क्र.PS १/१०६ या जागेवर नागरीकांची घरे झालेमुळे मौजे चिखली मधील गट क्र.१४४५, १४४६ व १४५३ मधिल प्राथमिक शाळा आरक्षण क्र.(PS १/१०६) हे आरक्षण या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी. मोशी येथील गट नं.४६५ चे आरक्षण बदलून तिथे बैलगाडा घाट, कुस्ती आखाडा गाव जत्रा म्हणून आरक्षणात बदल करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार पिंपरी कॅम्प येथील पद्मभुषण कर्मवीर भाऊराव पाटील, शाळा क्र.३१/१ व ३१/२ च्या पाठीमागे असलेले सिटी सर्व्हे नं.१२१३ ते १२२१ ही मिळकत रहिवासी झोनमध्ये दाखविलेली आहे. सदर मिळकत सुरुवातीपासून आजपर्यंत मोकळी आहे व सदरील जागा महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे. सदर मिळकतीवर गेल्या कित्येक वर्षापासून तेथील नागरिक खेळण्यासाठी उपयोग करतात. तसेच संपूर्ण पिंपरी कॅम्पमध्ये अंदाजे १ लाख लोकसंख्या असलेल्या भागात खेळण्यासाठी एकही जागा उपलब्ध नाही. पिंपरी कॅम्प येथील सिटी सर्व्हे नं.१२१३ ते १२२१ असलेले रहिवासी झोनवर खेळण्याचे मैदानाकरीता वापरासाठी प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी. मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाकडून महापालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आलेल्या क्षेत्रातील मौजे वाकड स.नं.२११ ही जमिन मंजूर विकास योजनेत water Body म्हणून दर्शविलेली आहे. परंतु प्रत्यक्षात जागेवर असे कांही दिसुन येत नाही. म्हणून ही जमीन निवासी विभागात समाविष्ठ करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे भोसरी येथील सर्व्हे क्र.१ या प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील ५.७६ हेक्टर निवासी विभागातील जमीन महापालिकेच्या उपयोगासाठी (M.P) राखून ठेवणेकामी विकास योजनेत म.प्रा.व.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची पूर्ण वैधानिक कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मामुर्डी गावालगत गहुंजे येथिल सिटी पार्कस् प्रा.लि.या कंपनी तर्फे विकसित करण्यात येणाऱ्या निवासी व बिगरनिवासी गृहप्रकल्पासाठी गट नं.१८४, १८६, १८९, १९०, १९२, १९५, २२२, २२३, २२४ येथे महापालिकेमार्फत १०२० KLD पाणीपुरवठा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- थेरगाव सर्वे ८५ मधील असलेले शेती क्षेत्र (ग्रीन झोन) बदलून तेथे निवासी झोन करण्यात यावा. सद्दस्थीतीत आजूबाजूला व सदरच्या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाल्याने महाराष्ट्र नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदल करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.श्रीरंग बारणे व मा.सतीष दरेकर यांची मा.गणेश भोंडवे व मा.प्रशांत शितोळे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८२३ विषय क्रमांक :-१८

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.मोटे एकनाथ नानासाहेब व मा.काटे राजेंद्र भिकनशेठ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३६५ दि.६/१/२०१०

विषय :- झोन बदलणेबाबत-

फुगेवाडी ते कासारवाडी दरम्यान रेल्वेगेटच्या पश्चिमेस स.नं.४७३ ते स.नं.४९६ व ७०० स.नं.मधील शेती क्षेत्र बदलुन तेथे निवासी झोन करण्यात यावा. महाराष्ट्र नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदल करण्यात यावा. सद्यपरिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना शेती करणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांची मानसिकता पहाता तेथे भविष्यात झोपडपट्टी होऊ शकते. तरी मनपाने निवासी झोन केल्यास नियोजनबध्द विकास होईल. तरी त्यास मान्यता देणेत येत आहे. मौजे रावेत येथील स.नं.१२३ पैकी १२४ पै. १२५ पैकी, १२७, १२८, १२९, १३०, १३१ ह्या वाल्हेकरवाडी ते रावेत या ३४.५० मी. रुंद रस्त्याचे उत्तरेला असणाऱ्या जमिनी शेतींना विकास विभागामध्ये / हरित विभागामध्ये आहे. आता या जमिनीच्या तीनही बाजूंनी निवासी / रहिवासी झोन आहे. त्यामुळे ह्या जमीनीचा वापर सुध्दा रहिवासी निवासी प्रयोजनासाठी अनधिकृतपणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ३४.५० मी.रुंद रस्त्याचे पासून उत्तरेकडील वरील स.नं.चे सर्व क्षेत्र निवासी / रहिवासी विभागात समाविष्ट करणेकामी मंजूर विकास योजनेस फेरबदल करणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व कार्यवाही उदा.नागरिकांच्या सुचना व हरकती मागविणे सुनावणी घेणे व प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेकामी मा.महापालिका आयुक्तांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. गट क्र.१२९७ मधिल जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने अन्य कारणासाठी आरक्षित केली असल्यामुळे मौजे चिखली मधील गट क्र.१२९४, १२९७, १३०३, १३०४, १३०५ व १३०७ मधील गार्डन

(आरक्षण क्र.G १/१०८) चे आरक्षण हे या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे. मोरे वस्ती या भागातील प्राथमिक शाळा आरक्षण क्र.PS १/१०६ या जागेवर नागरीकांची घरे झालेमुळे मौजे चिखली मधील गट क्र.१४४५, १४४६ व १४५३ मधिल प्राथमिक शाळा आरक्षण क्र.(PS १/१०६) हे आरक्षण या गटांमध्ये न घेता अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे अथवा रद्द करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे. मोशी येथील गट नं.४६५ चे आरक्षण बदलून तिथे बैलगाडा घाट, कुस्ती आखाडा गाव जत्रा म्हणून आरक्षणात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार पिंपरी कॅम्प येथील पद्मभुषण कर्मवीर भाऊराव पाटील, शाळा क्र.३१/१ व ३१/२ च्या पाठीमागे असलेले सिटी सर्व्हे नं.१२१३ ते १२२१ ही मिळकत रहिवासी झोनमध्ये दाखविलेली आहे. सदर मिळकत सुरुवातीपासून आजपर्यंत मोकळी आहे व सदरील जागा महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे. सदर मिळकतीवर गेल्या कित्येक वर्षापासून तेथील नागरिक खेळण्यासाठी उपयोग करतात. तसेच संपूर्ण पिंपरी कॅम्पमध्ये अंदाजे १ लाख लोकसंख्या असलेल्या भागात खेळण्यासाठी एकही जागा उपलब्ध नाही. पिंपरी कॅम्प येथील सिटी सर्व्हे नं.१२१३ ते १२२१ असलेले रहिवासी झोनवर खेळण्याचे मैदानाकरीता वापरासाठी प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाकडून महापालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आलेल्या क्षेत्रातील मौजे वाकड स.नं.२११ ही जमिन मंजूर विकास योजनेत water Body म्हणून दर्शविलेली आहे. परंतु प्रत्यक्षात जागेवर असे कांही दिसुन येत नाही. म्हणून ही जमीन निवासी विभागात समाविष्ठ करण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे भोसरी येथील सर्व्हे क्र.१ या प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील ५.७६ हेक्टर निवासी विभागातील जमीन महापालिकेच्या उपयोगासाठी (M.P) राखून ठेवणेकामी विकास योजनेत म.प्रा.व.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची पूर्ण वैधानिक कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मामुर्डी गावालगत गहुंजे येथिल सिटी पार्कस् प्रा.लि.या कंपनी तर्फे विकसित करण्यात येणाऱ्या निवासी व बिगरनिवासी गृहप्रकल्पासाठी गट नं.१८४, १८६, १८९, १९०, १९२, १९५, २२२, २२३, २२४ येथे महापालिकेमार्फत १०२० KLD पाणीपुरवठा करणेस मान्यता देणेत येत आहे. थेरगाव सर्वे ८५ मधील असलेले शेती क्षेत्र (ग्रीन झोन)

बदलून तेथे निवासी झोन करण्यात यावा. सद्दस्थीतीत आजूबाजूला व सदरच्या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाल्याने महाराष्ट्र नगररचना व विकास अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :-१९

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.खेडकर घनशाम रामचंद्र व मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७४ दि.६/१/२०१०

विषय :- मौजे चऱ्होली स.नं.४१४ (४७०) मध्ये कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत- (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये)

मौजे चऱ्होली येथील स.नं.४१४ (४७०) पै मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढीच्या विकास योजनेत बैलगाडा शर्यत घाटाचे शेजारी निवासी विभाग दर्शविण्यात आला आहे. सदर जागेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ०.५० हेक्टर क्षेत्रात कुस्ती आखाडा हे आरक्षण प्रस्तावित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८२४ विषय क्रमांक :-१९

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.खेडकर घनशाम रामचंद्र व मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ यांचा दि.६/१/२०१० चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३७४ दि.६/१/२०१०

विषय क्रमांक १९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल -७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २०

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.कक्ष-१-कावि-१८-२०१० दि.५.०२.२०१०

विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम १२ अन्वये प्रश्न न्यायाधिशांकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ११(ब) अन्वये पालिका सदस्य महापालिका सभेस लागोपाठ ३ महिन्यांचे कालावधीत तात्पुरता आजार किंवा महापालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य प्रसंगी महापालिकेच्या सभांना स्वतः गैरहजर राहील, तर असा सदस्य पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यास अनर्ह ठरण्याची तरतूद आहे.

मा.नगरसेवक सौ.सारिकाताई संतोष लांडगे, दि.३१.०७.२००७ ते १९.११.२००७, मा.श्रीमती चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे, दि.२०.४.२००७ ते ३०.९.२००७, मा.श्री.राजेंद्र भिकनशेठ काटे, दि.२०.४.२००७ ते २०.७.२००७ व मा.अण्णा दादू बनसोडे, दि.२०.९.२००७ ते दि.१९.१२.२००७ याप्रमाणे सलग तीन महिन्याच्या कालवधीत मा.महापालिका सभांस उपस्थित नव्हते.

वरील कालावधीत उक्त नगरसेवकांनी स्वतःहून अनुपस्थितीचे कारण तात्पुरता आजार असल्याचे कळविलेले नाही. वरीलपैकी मा.अण्णा बनसोडे यांना दि.१४.२.२००८ रोजी मा.आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस दिली होती, तसेच मा.सारिकाताई लांडगे, मा.राजेंद्र काटे व मा.चंद्रकांता सोनकांबळे या नगरसेवकांना आयुक्त यांनी दि.०८.०७.२००८ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊनही त्यांनी त्यांच्या मनपा सभेस अनुपस्थितीबाबत कळविलेले नाही. मात्र सौ.सारिकाताई लांडगे यांनी दि.०७.०७.२००८ रोजीचे अर्जान्वये वैद्यकीय दाखल्यासह त्यांचे मनपा सभेस अनुपस्थितीचे कारण तात्पुरता आजार असल्याचे नगरसचिव यांना लेखी कळविलेले आहे.

मा.सारिकाताई लांडगे, मा.राजेंद्र काटे व मा.चंद्रकांता सोनकांबळे या नगरसेवकांना दि.०८.०७.२००८ रोजी आयुक्त यांनी अनुपस्थितीबद्दल कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. सदरील नगरसेवकांनी त्यांचे खुलाशे दि.०९.०७.२००८ रोजी सादर केलेले आहेत. तिन्ही नगरसेवकांनी सादर केलेल्या दि.०९.०७.२००८ च्या खुलाशात अनुपस्थितीचे कोणतेही कारण दिलेले नाही. उलटपक्षी ना.उच्च न्यायालयाचे १) श्रीमती नूरजहान वि. महाराष्ट्र शासन

२००४(२) All M.R. पान १, २) मधुकर पाटील वि. महाराष्ट्र शासन २००४(६) BCR पान ६५९, ३) साजेदा अहमद वि. मालेगाव म्युनिसिपल कॉर्पोरेशन २००५(१) BCR पान १४२, व ४) मार्टिन निर्मल मोरेश वि. महाराष्ट्र शासन २००१(४) MHLJ पान ६४३, या न्यायनिर्णयाचे दाखले देऊन आयुक्तांचे नोटीस देण्याचे अधिकारास आव्हान देऊन वाद उत्पन्न केलेला आहे.

सदरील सदस्यांनी त्यांचे अनुपस्थितीचे कारणासंबंधी त्या त्या वेळी महापालिकेस कळविले नसल्याने व सलग ३ महिन्याचे कालावधीत ते मनपा सभेस अनुपस्थित असल्याने ते पालिका सदस्यपदी राहण्यास अनर्ह ठरत आहेत असे आयुक्त म्हणून माझे मत झाले आहे. तथापि, तसे ठरविण्याचा अधिकार आयुक्तांना नसून न्यायाधिशांना असल्याने वरील अधिनियमातील कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यायाधिशांकडे संदर्भ दाखल करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी आयुक्त यांना महापालिकेने तशी परवानगी देणे कायद्याने आवश्यक आहे.

या संदर्भात विषयपत्र मा.महापालिका सभेपुढे ठेवले असता, मा.महापालिका सभा ठ.क्र.६५४ दि.३.६.२००९ अन्वये तसेच ठ.क्र.६५६ दि.३.६.२००९ अन्वये सदरचा विषय दि.१९.६.२०१० चे मा.महापालिका सभेपुढे ठेवण्याचा निर्णय दिलेला आहे.

शासनाचे मा.उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.पीसीएम२००९/१०१०/प्र.क्र.३२२/२००९/नवि२२, दि.२० जानेवारी २००९ अन्वये मा.महापालिका सभेने दि.१९.६.२०१० रोजीच्या सभेत विषय घेणेकामी जो निर्णय दिलेला आहे, ती बाब उचित नसल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४४८, ४५१ यांचा संयुक्तरित्या विचार करता, कलम ४४८ नुसार या प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात, सदर विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने महापालिका सभेने पारीत केलेला ठराव क्र.६५४, दि.३.६.०९ व ठराव क्र.६५६, दि.३.६.०९ रद्द करुन जा.क्र.आ/कक्ष-१/कावि/१८६/२००८,दि.१८.७.२००८ व आ/कक्ष-१/कावि/२५४/२००८, दि.८.१०.२००८ नुसार न्यायालयास संदर्भ करण्यास आयुक्त यांना परवानगी देण्यास मान्यता देणेसाठी सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे ठेवण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे. शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने महापालिका सभेने पारीत केलेले ठ.क्र.६५४ दि.३.६.०९ व ठ.क्र.६५६ दि.३.६.०९ रद्द करणेत यावेत. मा.सारिकाताई संतोष लांडगे, मा.राजेंद्र भिकनशेठ काटे, मा.चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे, मा.आण्णा दादू बनसोडे या नगरसेवकांनी मा.महापालिका सभांना अनुपस्थितीबाबत दिलेले आजारपणाचे कारण मान्य करणेत यावे. विषय क्रमांक २० दप्तरी दाखल करणेत यावा.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर :- कायदयातील प्रोव्हीजन आपल्यासमोर मांडलेली आहे. आयुक्तांनी त्यांना काढण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यांनी त्यांचे वैद्यकीय कारण दिलेले आहे. पहिले हनुमंत भोसले, यांचे प्रकरण माहित आहे त्यात कोर्टाने त्यांना संधी दिलेली आहे. त्यामुळे आयुक्तांनी ठेवलेले डॉकेट सभागृहास मान्य नसेलतर आयुक्तांचे मत आपण फेटाळून टाकू शासन निर्णय घेईल.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८२५ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.कक्ष-१-कावि-१८-२०१० दि.५.०२.२०१०

विषय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम १२ अन्वये प्रश्न न्यायाधिशांकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ११(ब) अन्वये पालिका सदस्य महापालिका सभेस लागोपाठ ३ महिन्यांचे कालावधीत तात्पुरता आजार किंवा महापालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण या व्यतिरिक्त अन्य प्रसंगी महापालिकेच्या सभांना स्वतः गैरहजर राहील, तर असा सदस्य पालिका सदस्य म्हणून पदावर राहण्यास अनर्ह ठरण्याची तरतूद आहे.

मा.नगरसेवक सौ.सारिकाताई संतोष लांडगे, दि.३१.०७.२००७ ते १९.११.२००७, मा.श्रीमती चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे, दि.२०.४.२००७ ते ३०.९.२००७, मा.श्री.राजेंद्र भिकनशेठ काटे, दि.२०.४.२००७ ते २०.७.२००७ व मा.अण्णा दादू बनसोडे, दि.२०.९.२००७ ते दि.१९.१२.२००७ याप्रमाणे सलग तीन महिन्याच्या कालवधीत मा.महापालिका सभांस उपस्थित नव्हते.

वरील कालावधीत उक्त नगरसेवकांनी स्वतःहून अनुपस्थितीचे कारण तात्पुरता आजार असल्याचे कळविलेले नाही. वरीलपैकी मा.अण्णा बनसोडे यांना

दि.१४.२.२००८ रोजी मा.आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस दिली होती, तसेच मा.सारिकाताई लांडगे, मा.राजेंद्र काटे व मा.चंद्रकांता सोनकांबळे या नगरसेवकांना आयुक्त यांनी दि.०८.०७.२००८ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊनही त्यांनी त्यांच्या मनपा सभेस अनुपस्थितीबाबत कळविलेले नाही. मात्र सौ.सारिकाताई लांडगे यांनी दि.०७.०७.२००८ रोजीचे अर्जान्वये वैद्यकीय दाखल्यासह त्यांचे मनपा सभेस अनुपस्थितीचे कारण तात्पुरता आजार असल्याचे नगरसचिव यांना लेखी कळविलेले आहे.

मा.सारिकाताई लांडगे, मा.राजेंद्र काटे व मा.चंद्रकांता सोनकांबळे या नगरसेवकांना दि.०८.०७.२००८ रोजी आयुक्त यांनी अनुपस्थितीबद्दल कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. सदरील नगरसेवकांनी त्यांचे खुलाशे दि.०९.०७.२००८ रोजी सादर केलेले आहेत. तिन्ही नगरसेवकांनी सादर केलेल्या दि.०९.०७.२००८ च्या खुलाशात अनुपस्थितीचे कोणतेही कारण दिलेले नाही. उलटपक्षी ना.उच्च न्यायालयाचे १) श्रीमती नूरजहान वि. महाराष्ट्र शासन २००४(२) All M.R. पान १, २) मधुकर पाटील वि. महाराष्ट्र शासन २००४(६) BCR पान ६५९, ३) साजेदा अहमद वि. मालेगाव म्युनिसिपल कॉर्पोरेशन २००५(१) BCR पान १४२, व ४) मार्टिन निर्मल मोरेश वि. महाराष्ट्र शासन २००१(४) MHLJ पान ६४३, या न्यायनिर्णयाचे दाखले देऊन आयुक्तांचे नोटीस देण्याचे अधिकारास आव्हान देऊन वाद उत्पन्न केलेला आहे.

सदरील सदस्यांनी त्यांचे अनुपस्थितीचे कारणासंबंधी त्या त्या वेळी महापालिकेस कळविले नसल्याने व सलग ३ महिन्याचे कालावधीत ते मनपा सभेस अनुपस्थित असल्याने ते पालिका सदस्यपदी राहण्यास अनर्ह ठरत आहेत असे आयुक्त म्हणून माझे मत झाले आहे. तथापि, तसे ठरविण्याचा अधिकार आयुक्तांना नसून न्यायाधिशांना असल्याने वरील अधिनियमातील कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यायाधिशांकडे संदर्भ दाखल करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी आयुक्त यांना महापालिकेने तशी परवानगी देणे कायद्याने आवश्यक आहे.

या संदर्भात विषयपत्र मा.महापालिका सभेपुढे ठेवले असता, मा.महापालिका सभा ठ.क्र.६५४ दि.३.६.२००९ अन्वये तसेच ठ.क्र.६५६ दि.३.६.२००९ अन्वये सदरचा विषय दि.१९.६.२०१० चे मा.महापालिका सभेपुढे ठेवण्याचा निर्णय दिलेला आहे.

शासनाचे मा.उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.पीसीएम२००९/१०१०/प्र.क्र.३२२/२००९/नवि२२, दि.२० जानेवारी २००९ अन्वये मा.महापालिका सभेने दि.१९.६.२०१० रोजीच्या सभेत विषय घेणेकामी जो निर्णय दिलेला आहे, ती बाब उचित नसल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४४८, ४५१ यांचा संयुक्तरित्या विचार करता, कलम ४४८ नुसार या प्रकरणी हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून ३० दिवसात, सदर विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने महापालिका सभेने पारीत केलेला ठराव क्र.६५४, दि.३.६.०९ व ठराव क्र.६५६, दि.३.६.०९ रद्द करुन जा.क्र.आ/कक्ष-१/कावि/१८६/२००८, दि.१८.७.२००८ व आ/कक्ष-१/कावि/२५४/ २००८, दि.८.१०.२००८ नुसार न्यायालयास संदर्भ करण्यास आयुक्त यांना परवानगी देण्यास मान्यता देणेसाठी सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे ठेवण्यात यावा.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे. शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने महापालिका सभेने पारीत केलेले ठ.क्र.६५४ दि.३.६.०९ व ठ.क्र.६५६ दि.३.६.०९ रद्द करणेत येत आहेत. मा.सारिकाताई संतोष लांडगे, मा.राजेंद्र भिकनशेठ काटे, मा.चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे, मा.आण्णा दादू बनसोडे या नगरसेवकांनी मा.महापालिका सभांना अनुपस्थितीबाबत दिलेले आजारपणाचे कारण मान्य करणेत येत आहे. विषय क्रमांक २० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २१

दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

श्री.संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात करसंकलन विभागाकडून मिळविलेल्या माहितीप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेचे २५ नगरसदस्य/नगरसदस्या अनाधिकृत बांधकामाशी निगडीत असुन अशा नगरसदस्यावर कारवाई करण्यासाठीची विनंती महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली होती. शासनाने मनपा आयुक्ताकडे हे अर्ज चौकशीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

या अर्जाच्या चौकशीकामी सर्व नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा त्या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. त्यात काही नगरसदस्याचा खुलासा समाधान कारक असुन काही नगरसेवकांनी मात्र अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत./ होती. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अनाधिकृत बांधकामे गुंठेवारी कायद्यानुसार नियमानुकुल झालेली असली तरी

त्यामुळे अशा नगरसेवकांवर अपात्रता सिध्द होते वा नाही ही बाब न्यायालयाकडे संदर्भ करुनच खात्री करणे शक्य आहे.

तसेच काही नगरसेवकांनी आपले खुलाशात सदरची मालमत्ता / बांधकामे आपले नसुन आपले वडिल / आई / इतर नातेवाईक यांचे आहेत असे आपल्या खुलाशात नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे करसंकलन विभागाकडे दुरुस्त नोंदीचे कागदपत्र सादर केलेले आहेत. तथापि संबंधित नगरसेवकांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र भरतेवेळी केलेले मालमत्ता विषयक प्रतिज्ञापत्र पाहता सदरची मालमत्ता त्यांनी त्यांचे नावे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. अशा प्रसंगी संबंधित नगरसेवक अपात्र होईल वा कसे याचा न्यायालयांनी निर्णय देणे योग्य राहील व त्यासाठी न्यायालयाकडे संदर्भ करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे नगरसदस्यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाविषयी वाद उत्पन्न झाला असल्याने त्याविषयी न्यायाधिशांकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि कलम १२ तील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील विषयपत्र दि.१७/०३/२००८ रोजी मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत आले होते. तथापि महापालिका सभा ठराव क्रमांक ६५३ दि.०३/०६/२००९ अन्वये सदर विषयाबाबतचा विचार दि.१९/०६/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा असा निर्णय झाला.

मा.उपसचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२०/०१/२०१० चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामे असणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४४८ चा विचार करता कलम ४४८ नुसार याप्रकरणी हे आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसात सदरचा विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला असल्याने त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.काळुराम पवार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८२६ विषय क्रमांक :- २१
दिनांक :- २०.२.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १०५ /२०१०
दिनांक :- २ / ०३ /२०१०

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.